दस्तावेज क्र. ५८

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

( महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण )

## Maharashtra Water Resources Regulatory Authority

(A Statutory Authoirty Established u/s 3 of Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005)

**आदेश क्रमांक : ३/२०१९**

**धोम व बालकावाडी यांच्या प्रकल्पामधे डी.पी.आर. प्रमाणे पाणी वाटप करण्याविषयी (प्र. क्र. ६/२०१८) श्री. नंदकुमार दगडु माने (पाटील, अध्यक्ष, चंद्रगिरी पाणी वापर सहकारी सेवा संस्था (म), रहिमतनगर कळवा, सातारा ४१५५११) व २ ईतर, यांचे अपील.**

१) श्री. नंदकुमार दगडु माने (पाटील, अध्यक्ष, चंद्रगिरी पाणी वापर सहकारी सेवा संस्था (म), रहिमतनगर कळवा, सातारा ४१५५११

२) श्री. अविनाश जयवंत माने, अध्यक्ष कालभैरव कालवा पाणी वापर सोसायटी, रहिमतपूर, सातारा, ४१५५११

३) श्री. शिवाजी कोंडीराम माने, अध्यक्ष, पवनपूत्र कालवा पाणी वापर सोसायटी, रहिमतपूर, सातारा, ४१५५११ ...................... **याचिकाकर्ते**

**विरुध्द**

१. मुख्य अभियंता (जंसं) ज.सं.वि, सिंचन भवन, बार्ने रोड, मंगळवार पेठ, पूणे, ४११०११

२. सचिव, (ज.सं.व्य व सी.ए.डी.), ज. सं. विभाग, मंत्रालय, मुंबई–४०००३२ (लक्षवेध– श्री. संजय टाटु, उ.स.सि.व्य.)

9th & 11th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005
Tel.: + 91-22-2215 2019 E_mail : mwrra@mwrra.in Website : www.mwrra.org

३. जिल्हाधिकारी, सातारा, जिल्हाधिकारी कार्यालय, पोवई नाका, सातारा, (लक्षवेध–श्री संतोष जाधव, उ. वि. य. फलटण)

४. अधिक्षक अभियंता, सातारा सिंचन मंडळ, सिंचन भवन, कृष्ण नगर, सातारा – ४१५५०३

५. अधिक्षक अभियंता, सातारा सिंचन प्रकल्प मंडळ, सिंचन भवन, कृष्ण नगर, सातारा – ४१५५०३

६. श्री. विलास नलावडे, हनुमंत पाणी वापर संस्था, अलजापुर, फलटण, सातारा, मार्फत, ॲड. व्ही. एस. टाळकुटे, ५ पहिला माळा, पारेख व्होरा चेंबर्स, ६६, नगीनदास मास्टर रोड, फोर्ट, मुंबई, ४००००१

७. श्री. संतोष हनुमंतराव शिंदे, ज्योतिर्लींग पाणी वापर संस्था, कोपर्डे, ता.खंडाळा, जि. सातारा, ४१५५२१ ............... प्रतिवादी

**कोरम:**

**श्री. के. पी. बक्षी, अध्यक्ष**

**श्री. व्ही. एम. कुळकर्णी, सदस्य**

**(ज. सं. अभियांत्रिकी)**

**श्री. विनोद जे. तिवारी, सदस्य, (विधि)**

**डॉ. एस. टी. सांगळे, सदस्य (इकॉनामिक्स)**

**दि. ०९/०४/२०१९**

## पार्श्वभूमि

१. प्राथमिक विवाद निवारण अधिकारी (PDRO) यांना केलेल्या अपीलावर त्यांनी दिलेल्या दि. २५/०५/२०१८ च्या आदेशामुळे ज्यात पाणी वापर संस्थांना धोम डावा किनारा कालव्यातुन त्याच्या पुच्छ शेवट भागाला, त्यांना जो हक्क महाराष्ट्र सिंचन पध्दतीने शेतकऱ्यांकडुन व्यवस्थापन अधिनियम, २००५ (एमएमआयएसएफ) अधिनियम अन्वये मिळाला आहे, त्यापेक्षा कमी पाणी देण्याच्या विषयावरुन केलेल्या अपीलाशी हे प्रकरण संबंधित आहे. त्यामुळे अपीलार्थीनी मजनिप्रा अधिनियम, २००५ च्या कलम २२ (३) अंतर्गत जो आदेश, मुख्य अभियंता (ज.सं.) पूणे आणि प्राथमिक विवाद निवारण अधिकारी (PDRO) यांनी कृष्णा खोऱ्याकरिता, दि. २५/०८/२०१८ ला दिला त्याला आव्हान देण्यासाठी ते प्राधिकरणाकडे आले. अपीलार्थीनी अभिकथित केले की धोम–बालकावाडी कालव्याकडे खुप जास्त पाणी वळवल्यामुळे त्यांना त्यांच्या हक्काचे कायदेशीर रित्या पाणी मिळण्यापासुन वंचित केले आहे. अपीलार्थी कृष्णा प्रकल्प टप्पा–१ च्या अंतर्गत येतात. ज्याला १९६७ मधे प्रशासकीय मान्यता राज्यशासना कडुन प्राप्त झाली आहे. कृष्णा प्रकल्प टप्पा–१ चे ३ घटक (१) धोम धरण (२) कन्हेर धरण व (३) आरफळ कालवा आहेत.

कृष्णा प्रकल्प टप्पा–१ मुळे कृष्णा खोऱ्यातील ७४,००० हेक्टरमधे सिंचनाची सोय झाली आहे. त्यांनतर वर्ष १९९६ मधे धोम बालकावाडी प्रकल्पाला कृष्णा प्रकल्प टप्पा–१ चा भाग म्हणून मान्यता मिळाली ज्यामधे कृष्णा नदीवर सध्याच्या धोम धरणाच्या १९ कि.मी. दुर वरच्या प्रवाहात धरणे बांधण्याची परवानगी मिळाली. याच्या डी.पी.आर. मधे मुलत: असे प्रस्तावित केले होते की, धोम–बलकावाडी धरणाचे पाणी धोम धरणात सोडण्यात येईल आणि नंतर धोम धरण्याच्या डाव्या किनारावरील बोगद्याव्दारे १८१०० हेक्टर कृष्णा खोऱ्याच्या निरा उपखोऱ्यातील

क्षेत्राला सिंचित करण्यासाठी धोम–बलकावाडी कालव्यात सोडण्यात येईल. अपिलार्थींची व्यथा आहे, त्यांना त्यांच्या हक्काचे पाणी अजुनही मिळाले नाही.

**२.** त्याआधी सध्याचे अपीलार्थी प्राधिकरणाकडे गेले होते. (प्र. क्र. ४/२०१६) प्राधिकरणाने सर्व पक्षकारांची या प्रकरणात सुनावणी केली आणि खाली दिल्याप्रमाणे निर्देश देऊन हे प्रकरण निकालात काढले.

१. हस्तक्षेपींना त्यांची सुनावणीकरिता असलेल्या हक्काची संधी द्यायला हवी, ज्यामुळे त्यांचा प्रारंभीचा अर्ज ध्यानात घेवुन ते त्यांचे म्हणणे मांडु शकतील. त्यामुळे हे प्रकरण पीडीआरओकडे ताजी सुनावणी घेण्यासाठी व त्याची सर्व संबंधित पक्षांना नोटीस निर्गमित करण्यासाठी पाठवित आहे. पीडीआरओ हा आदेश मिळाल्यावर ३० दिवसांच्या आत ताजी सुनावणी घेतील.

२. पीडीआरओ ला निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनी अर्जात दिलेले सर्व संबंधित मुद्दे जे त्यांच्या समोर मांडले जातील, विचारात घेवुन स्वयंस्पष्ट असलेले आदेश द्यावेत. या आदेशामुळे क्षेत्रात काम करणाऱ्यांना मार्गदर्शिका म्हणुन वापरता येईल, अशी अपेक्षा आहे; तसेच त्यामुळे संबंधित व अर्थपुर्ण असलेली त्यांच्या पाणी हक्काची माहिती विविध हितकर्त्यांना मिळेल. सुनावणी झाल्यावर पीडीआरओ त्यांचे आदेश १ महिन्याच्या आंत निर्गमित करतील.

३. पीडीआरओ निर्धारित करतील की, याचिकाकर्ते पाणी वापर संस्थांना त्याचा पाण्याचा हक्काचा हिस्सा मिळतो की नाही, नसल्यास (त्याचे कारण शोधुन), आवश्यक निर्देश देतील ज्यामुळे याचिकाकर्त्यांच्या हिताचे संरक्षण होईल.

४. अधिक्षक अभियंता, एसआयपीसी, सातारा यांनी दिलेला दि. ०३/०४/२०१७ चा प्रस्ताव याव्दारे खारीज केला आहे.

तथापि, हा पीडीआरओ चा प्रश्न आहे की, कथित प्रस्तावामधील संबंधित माहिती, पडताळणी केल्यानंतर, त्यांच्या निर्देशात अंतर्भुत करावी की नाही.

३. त्याप्रमाणे, सध्याच्या अपीलार्थीनी, पाणी वापर संस्थेच्या वतीने प्राथमिक विवाद निवारण अधिकारी, (पी.डी.आर.ओ.) कृष्णा खोरे विषयी (प्र. क्र. २—पीडीआरओची नस्ती) डी.पी.आर.मधे दिल्याप्रमाणे पाण्याचे वाटप धोम प्रकल्प व धोम—बलकावाडी प्रकल्पातुन करावे अशी प्रार्थना केली. आणि असे देखील सांगितले की, जो पर्यंत धोमधरण त्याच्या क्षमतेच्या ७५% भरत नाही तो पर्यंत धोम बलकावाडी प्रकल्पासाठी पाणी सोडू नये.

४. पीडीआरओ ने सर्व पक्षकारांची सुनावणी घेऊन दि. २५/०५/२०१८ चे आदेश जारी केलेत की, कालवा सल्लागार समितिच्या निर्णयाप्रमाणे १५ ऑक्टोबर ला जे पाणी उपलब्ध आहे ते वाटून घ्यावे. पीडीआरओने अपीलार्थीची ''जो पर्यंत धोमधरण त्याच्या क्षमतेच्या ७५% भरत नाही तो पर्यंत धोम बलकावाडी प्रकल्पासाठी पाणी सोडू नये.'' ही मागणी अमान्य केली. पीडीआरओनी दुजोरा दिला की, धोम—बलकावाडी प्रकल्पाचे पाणी नियोजन हे ८ माही आहे. त्यांच्या आदेशात निर्देशित केले आहे की मजनिप्रा अधिनियम, २००५ च्या कलम १२ (६) (सी) मधील तरतूदी मधे दिल्यप्रमाणे, पाण्याची जी कमतरता आहे, ती वाटुन घ्यावी.

५. अपीलार्थीनी २५.०५.२०१८ च्या पीडीआरओ च्या आदेशाने व्यथित होऊन मजनिप्रा २००५ कलम २२ (३) अन्वये प्राधिकरणाकडे अपील दाखल केले.

## प्रार्थनेचा सारांश

६. सध्या केलेल्या अपीलात त्यांनी प्राधिकरणाकडे प्रार्थना केली आहे की, त्यांना खालील प्रमाणे अनुतोष देण्यात यावा.

१. अपील दाखल करुन घ्यावे.

२. पीडीआरओचा दि. २५/०५/२०१८ चा त्यांचा प्र. क्र २/२०१७ चा आदेश रद्द करावा.

३. मंजुर असलेल्या डीपीआर प्रमाणे धोम व धोम—बलकावाडी दरम्यान करावयाच्या पाणी वाटपाचे निर्देश द्यावेत.

४. धोम—बलकावाडी प्रकल्प ४ माही प्रकल्प असल्याचे घोषित करावे कारण निरा—देवघर प्रकल्पाच्या डीपीआर मधे ०.९३ टीएमसी पाण्याचे धोम—बलकावाडी करिता स्थानांतर करण्याची कोणतीही तरतूद नाही.

५. जो पर्यंत धोमधरण त्याच्या क्षमतेच्या ७५% भरत नाही तो पर्यंत धोम बलकावाडी प्रकल्पासाठी पाणी सोडू नये.

६. धोम—बलकावाडी साठी रबी व उष्ण हवामानात पाणी सोडण्यास मनाई करावी.

७. कमतरतेच्या वर्षात धोम—बलकावाडी करता पाणी वळवण्याची मनाई करावी.

८. उपसा यंत्रणेचे नियोजन ८ महिन्यांचे असल्यामुळे कालव्यातुन पाण्याचा उपसा करण्याचा यंत्रणेला त्यांचा वापर २८ फेब्रुवारी नंतर करण्याची बंदी करावी.

९. प्राधिकरणाला वाटलेला दुसरा कोणताही अनुतोष, योग्य वाटेल असा जो प्रकरणाच्या स्थितिवर अवलंबून असेल, व्यापक जनहित लक्षात घेऊन देण्यात यावा.

**७. प्राधिकरणा समोर चाललेले कामकाज :—**

प्राधिकरणाने या प्रकरणात ३ सुनावण्या घेतल्या.

१) ३०/०७/२०१८ २) ०५/०९/२०१८ आणि ३) १९/११/२०१८; आणि प्रकरणात आणखी माहिती/ अभिलेख, जर असल्यास, मिळल्यानंतर आदेश जारी करण्यासाठी राखुन ठेवला.

**पहिली सुनवाणी ३० जुलै २०१८ ला घेतली व अंतरिम निर्देश दिलेत.**

८. पहिल्या सुनवानीला अपीलार्थी, प्रतिवादी क्र. ४ व ६ आणि प्रतिवादी क्र. ५ चे प्रतिनिधी हजर होते. सुनवाणीच्या वेळी अधिक्षक अभियंता, वि.सिं.मंडळ, सातारा म्हणजे प्रतिनिधी क्र. ४ यांनी अपीलावर त्यांचे म्हणणे दि. २७ जुलै, २०१८ च्या पत्राने दिले. रोजनामा कामकाजाचे कार्यवृत्त निर्गमित करण्यात आलेत ज्यामधे खाली दिल्याप्रमाणे अंतरिम निर्देश देण्यात आले.

८.१ पक्षकारांचे म्हणणे ऐकुण व अभिलेलातील नोंदी पाहून या प्राधिकरणाने स्वत:चे निरिक्षण अभिलेखीत करून खालील निर्देश जारी केले.

१) पीडीआरओ जे मुख्य अभियंता (सिं.वि) पूणे आहेत, त्यांचे नाव प्रतिवादींच्या यादीतुन वगळावे.

२) मुख्य अभियंता (ज.सं.) हे प्रथम क्रमांकाचे प्रतिवादी असतील.

३) प्रतिवादी क्र. ४ हे नोटराईजड् शपथपत्र दाखल करतील ज्यामधे अपीलार्थींचे सर्व मुद्दे व शिवाय खालील माहिती असेल.

अ) धोम धरणाचा लाभक्षेत्राचा नकाशा ज्यामधे पाणी वापर संस्थाचे कार्यक्षेत्र रेखांकित केले असेल.

ब) डीपीआर प्रमाणे धोम प्रकल्पाचे सिंचन लाभ क्षेत्र

क) पाणी वापर संस्थांना वाटप केलेला कोटा व धोम धरणाला गेल्या ३ वर्षात दिलेले पाणी

ड) डीपीआर मधे केलेली आवर्तन संख्येची तरतुद व प्रत्यक्षात (गेल्या ३ वर्षात) दिलेली आवर्तने

४) कोणतेही जास्तीचे शपथपत्र/प्रत्युत्तर हे २४/८/२०१८ च्या आधी दाखल करावे व त्याची प्रत सर्व पक्षकारांना द्यावी.

**दुसरी सुनवाणी ५ सप्टेंबर २०१८ ला घेतली व अंतरिम निर्देश दिलेत.**

९. दुसऱ्या सुनवाणीला अपीलार्थी, प्रतिवादी क्र. ४ व ५ चे प्रतिनिधी, अपालार्थी, प्रतिवादी क्र. ४ व ६ चे वकील हजर होते. पहिल्या सुनवाणीत दिलेल्या निर्देशानुसार अधिक्षक अभियंता, वि. सिं. मंडळ, सातारा म्हणजे प्रतिवादी, क्र. ४ यांनी त्यांच्या अनुपालन अहवाल दि. २३/०८/२०१८ च्या पत्रानुसार सादर केला. अपीलार्थीनी देखील त्यांचे म्हणणे २०/०८/२०१८ च्या पत्राने सादर केले. तथा अधिक्षक अभियंता, वि. सिं. मंडळ, सातारा म्हणजे प्रतिवादी, क्र. ४ यांनी अपीलार्थी यांच्या म्हणण्यावर त्यांचे म्हणणे दि. २७/०८/२०१८ च्या पत्राने सादर केले. रोजनामा कामकाजाचे कार्यवृत्त निर्गमित करण्यात आलेत ज्यामधे खाली दिल्याप्रमाणे अंतरिम निर्देश देण्यात आले.

९.१) पक्षकारांचे म्हणणे ऐकुण व अभिलेखातील कागदपत्रे पहिल्यावर, प्राधिकरणाने निरिक्षण नोंदवले की पीडीआरने २५/०५/२०१८ चा आदेश जारी करतांना, प्राधिकरणाच्या १२/०६/२०१७ च्या आदेशातील परिच्छेद–३ ची दखल घेतली नाही म्हणुन खालील निर्देश जारी केले.

१) प्रतिवादी क्र. ४ हे अपीलार्थीना त्यांना वाटप झालेल्या कोटयाचे पाणी कां मिळत नाही, यांची कारणे देतील.

२) ज्याअर्थी मुळ डीपीआर व नंतर सुधारित केलेल्या अहवालात पाण्याचे नियोजन विषयी परस्पर विरोधी तरतुदी असल्यामुळे, प्रतिवादी क्र. २ हे निरनिराळया पाणी वापर क्षेत्राचा व प्रकल्प घटकांचा उदा. कालवा, उपसा, सिंचन इ. पाण्याचा कोटा जाहीर करतील.

३) प्रतिवादी क्र. १ हे सुध्दा स्पष्ट करतील की, ज्यावर धोम प्रकल्पाच्या पाण्याचे नियोजन केले आहे, त्याची विश्वसनियता किती आहे.

४) प्रतिवादी क्र. ४ हे खाली दिलेली माहिती, गेल्या १० वर्षाकरिता, देतील

अ) धोम जलाशय व बलकावाडी जलाशयात उपलब्ध असलेली पाण्याची प्राप्ति

ब) धोम जलाशयात १५ ऑक्टोबर ला पाण्याची चल साठवण

क) धोम जलाशयात ३० जुन ला पाण्याची साठवण

ड) धोम बलकावाडीतुन सोडलेले पाणी

इ) धोम प्रकल्पाचा सिंचन, पेयजल, औद्योगिक पाणी वापर व बाष्पीभवन

५) प्रतिवादींनी आपले म्हणणे शपथपत्रामधे द्यावे.

६) प्रतिवादींनी अपीलार्थींना तसेच हस्तक्षेपकांना त्याच्या म्हणण्याच्या प्रति द्याव्यात

७) प्राधिकरणाने प्रतिवादी क्र. २ सुनावणी करिता हजर न झाल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.

८) सर्व प्रतिवादी विचारलेली माहिती ३० सप्टेंबर च्या आत सादर करतील.

**१९ नोव्हेंबर २०१८ ला तिसरी आणि अंतिम सुनावणी**

१०. तिसऱ्या सुनवाणीला अपीलार्थी, प्रतिवादी क्र. २, ४, व ५ चे व अपीलार्थीचे वकील, प्रतिवादी क्र. ४ व ६ हजर होते. दुसऱ्या सुनवणीत दिलेल्या निर्देशाप्रमाणे, ॲड. व्ही. एस. टाळकुटेंनी प्रतिवादी क्र. ६ करिता उत्तरादाखल आपले शपथपत्र दि. २८ सप्टेंबर २०१८ च्या तारखेचे, दाखल केले. तसेच कार्यकारी अभियंता, विशेष सिंचन विभाग, सातारा यांनी प्रतिवादी क्र. ४ चे वतीने दि. १०/१०/२०१८ शपथपत्र दाखल केले. रोजनामा कामकाजाचे कार्यवृत्त निर्गमित करण्यात आलेत ज्यामधे खाली दिल्याप्रमाणे अंतरिम निर्देश देण्यात आले.

१०.१) पक्षकारांनी केलेला युक्तिवाद आणि अभिलेखात असलेली कागदपत्रे यावर आधारलेले निर्देश या सुनवाणीमधे प्राधिकरणाने निर्गमित केले.

१. प्रतिवादी क्र. ४ खाली दिलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणीत प्रति हे निर्देश मिळाल्यापासून २ आठवडयाच्या आत प्राधिकरणाला सादर करतील; व त्याच्या प्रति सर्व पक्षकारांना देतील.

अ) राज्य शासनाने न्यायाधिकरणाला सादर केलेले कृष्णा प्रकल्पाच्या प्रत्येक प्रकल्पाचे नियोजित पाणी वापर

ब) कृष्णा प्रकल्प, धोम सिंचन प्रकल्प, धोम–बलकावडी प्रकल्पांचे, त्यांच्या प्रकल्प अहवालात दिल्याप्रमाणे, जर त्यात नंतर कांही बदल झाला असेल तर त्याप्रमाणे, पाणी नियोजन.

क) धोम धरणात उपलब्ध असलेल्या पाण्याचे वाटप, ज्यामधे, धोम–बलकावडी जलाशयात विविध कारणासाठी, जसे पेयजल, उद्योग, सिंचन इ.चे (जे धोम कालवे, धोम बलकावडी कालवे, शासकिय उपसा सिंचन योजना (स्कीमप्रमाणे), कृष्णा कालवे), सध्याच्या नियोजनामधे उपलब्ध आहे, हे सर्व समाविष्ट आहे.

ड) क्षेत्रीय पाणी वाटपाप्रमाणे, जे राज्य शासनाने शा. नि. १७ नोव्हेंबर २०१६ ला ठरवले आहे, पाण्याची विविध उपयोगांसाठी असलेली उपलब्धतता

इ) जलाशय व कालव्यातुन व्यक्तिगत उपस्यासाठी दिलेल्या परवानग्या.

२. अपीलार्थी, प्रतिवादी पुढच्या २ आवठवडयात म्हणजे ३१ डिसेंबर २०१८ पर्यत प्रत्युत्तरे तसे वाटल्यास सादर करु शकतात.

३. अंतिम आदेशासाठी, प्रकरण बंद केले आहे.

**कागदपत्रे जी अंतिम सुनावणी नंतर प्राप्त झाली.**

११. प्राधिकरणाने दिलेल्या दि. ०५/०९/२०१८ च्या निर्देशानुसार, श्री. व्ही. बी. जाधव, कार्यकारी अभियंता, धोम–भिमा प्रकल्प विभाग, सातारा, यांनी आवश्यक माहितीसह दि. १७/११/२०१८ चे शपथपत्र सादर केले आहे.

१२. प्राधिकरणाने दिलेल्या दि. १९/११/२०१८ च्या निर्देशानुसार, श्री. एन. टी. पोतदार, कार्यकारी अभियंता, विशेष सिंचन विभाग, सातारा यांनी प्राधिकरणाने मागितलेली माहिती दि. २९/१२/२०१८ च्या शपथपत्राने सादर केली आहे.

**अभिलेखात असलेली माहिती.**

१३. कृष्णा प्रकल्पाच्या विविध प्रकल्प घटकांसाठी केलेले पाणी वाटप

संदर्भः– दि. १३/०२/२००४ च्या म.कृ.खो.वि.महामंडळ, पूणे च्या निर्णय क्र. मकृखोविम/ कृष्णा प्रकल्प / एसटी–१/(२९७)/(१००८/९७)/सुधा. प्र. मान्यता/एम.पी–५/१३२९ अन्वये दिलेल्या, ४ थ्या सुधारित प्रा. मान्यतेचे पृ. ७९; आणि प्राधिकरणा समोर, श्री. व्ही. बी. जाधव, कार्यकारी अभियंता, धोम–बलकावडी प्रकल्प वि. सातारा यांनी दि. १७/११/२०१८ ला दाखल केलेले शपथपत्र.

| अ. क्र. | घटक | वाटप केलेला हिस्सा (टी.एम.सी.) |
|---|---|---|
| कृष्णा प्रकल्प, टप्पा क्र. १ | | |
| अ. | सिंचन | |
| १. | धोम कालवा (३२,९२५ हेक्टर) | ७.५८ |
| २. | कन्हेर कालवा (१०,०७० हेक्टर) | २.३१ |

| | | |
|---|---|---|
| ३. | आरफळ कालवा (३१,००५ हेक्टर) | ७.०८ |
| ४. | बाष्पीभवन | १.५८ |
| | एकुण –अ (७४०००हेक्टर) | १८.५५ |
| ब. | पेयजल | ४.८० |
| क. | औद्योगिक वापर | ०.४१७ |
| कृष्णा प्रकल्प, टप्पा क्र. १ एकुण | | २३.७६७ |
| कृष्णा प्रकल्प, टप्पा क्र. २ | | |
| अ. | सिंचन | |
| १. | उ.सि.यो.–५ व केटीबंधारे–९(१८.९४० हेक्टर) | ५.१५ |
| २. | जिहे–काथापूर उ.सि.यो. (२७,५०० हेक्टर) | ३.१७ |
| कृष्णा प्रकल्प, टप्पा क्र. २ एकुण | | ८.३२ |
| कृष्णा प्रकल्पाचा एकुण नियोजित पाणी वापर | | ३२.०८७ |

१४. धोम प्रकल्पातील पाणी वापराची तरतुद

संदर्भ : – श्री. व्ही.बी. जाधव, कार्यकारी अभियंता, धोम–भिमा प्रकल्प विभाग, सातारा यांचे दि. १७/११/२०१८ चे शपथपत्र.

| अ. क्र. | घटक | वाटप केलेला हिस्सा (टीएमसी) |
|---|---|---|
| १. | सिंचन | |
| | अ. खरीप | ३.०० |
| | ब. रब्बी | २.५७ |
| | क. उष्ण हवामान | १.९१ |
| | एकुण | ७.५८ |
| २. | पेयजल | २.६४ |
| ३. | औद्योगिक वापर | ०.२३ |
| ४. | बाष्पीभवनाने झालेली हानी | ०.९७ |
| | एकुण | ११.४२ |

१५. धोम बलकावडी प्रकल्पात पाणी वापराची तरतुद.

संदर्भ :— दि. ३०/०५/२०१७ च्या ज.सं.वि.च्या निर्णय क्र. धोमन—११०९/सीएन ६१६/०९/म. प्र.—१/ च्या ४ थ्या सुधारित प्र. मान्यता, धोम बलकावडी प्रकल्पासाठी, पृ. ५ व ६ प्रमाणे, आणि श्री. व्ही.बी. जाधव, कार्यकारी अभियंता, धोम—भिमा प्रकल्प विभाग, सातारा यांचे दि. १७/११/२०१८ चे शपथपत्र जे प्राधिकरणाकडे दाखल केले आहे.

| अ. क्र. | घटक | वाटप केलेला हिस्सा (टीएमसी) |
|---|---|---|
| १. | एकुण साठवण | ४.०८ |
| २. | मृत साठवण | ०.१२ |
| ३. | चल साठवण | ३.९६ |
| ४. | चल साठवणाची विभागणी | |
| | i) कृष्णा प्रकल्पाच्या ५ उसिंयो साठी पाणी सोडणे | ०.६४ |
| | ii) जिहेकाथापूर उसिंयो साठी पाणी सोडणे | ०.५३ |
| | iii) धोम बलकावडी प्रकल्पाच्या ला.क्षे.साठी पाणी सोडणे (१८,१०० हेक्टर) | २.७० |
| | iv) बाष्पीभवन हानी | ०.०९ |
| | धोम बलकावडीत साठवण केलेल्या पाण्याचा एकुण नियोजित वापर | ३.९६ |
| ५. | धोम बलकावडी कालव्याला पाण्याचा पुरवठा वाढविण्यासाठी निरा–देवघर कालव्यातुन पाण्याचा उपसा करणे | ०.९३ |
| ६. | धोम बलकावडी लाभक्षेत्रात पाण्याचा सिंचनासाठी वापर (२.७० + ०.९३) | ३.६३ |

१६. कृष्णा जल तंटा न्यायाधिकरणाच्या निर्णयाप्रमाणे दिलेल्या परवानगी प्रमाणे, जे सरसकट पणे ५९९ टीएमसी कोणत्याही एका जलवर्षात वापरता येते, त्याचे महाराष्ट्राने कृष्णा खोऱ्यातील मिळणाऱ्या वार्षिक पाण्याचे नियोजित वापर असे करण्याचे ठरवले आहे.

संदर्भ :— महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. सीडब्ल्युसी २००१/(१४७/२००१) — डब्ल्युआरपी, दि. २०/१०/२००१

| अ. क्र. | प्रकल्पाचे नाव | उपखोरे | नियोजित वापर टीएमसी मधे | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | सिंचन | पेयजल | उद्योग | एकुण |
| १ | धोम, कान्हेर व जिहे काथापूर उ.सि.यो. सहित कृष्णा प्रकल्प | क—१ | २६.८६८ | ४.०० | ०.४१७ | ३२.०८५ |
| २. | धोम बलकावडी कृष्णा प्रकल्पाचा भाग क—१ | क—१ | २.७५० | ०.०० | ०.०० | २.७५० |
| | एकुण | | | | | ३४.८३५ |

१७. जे पाणी धोम व धोम बलकावडी साठवणीचा वापर करुन, धोम जलग्रहण क्षेत्रातुन, ५० टक्के विश्वासाहर्तेवर उपलब्ध होईल त्याचे वार्षिक वापराचे नियोजन

संदर्भ :— १) कार्यकारी अभियंता, सातारा सिंचन विभाग, सातारा यांनी प्रतिवादी क्र. ४ करिता दिलेले दि. ११/१०/२०१८ ला दाखल केलेले शपथपत्र

२) कार्यकारी अभियंता, सातारा सिंचन विभाग, सातारा यांनी प्रतिवादी क्र. ४ व ५ करिता, दि. २९/१२/२०१८ ला दाखल केलेले शपथपत्र.

टी एम सी मधे

| | खरीप सिंचन | रबी सिंचन | उष्ण हवामानात सिंचन | एकुण सिंचन | पेयजल | उद्योग | बाष्पीभवन | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| धोम कालवे | ३.०० | २.६७ | १.९१ | ७.५८ | २.६४ | ०.२३ | ०.९७ | ११.४२ |
| धोम बलकावडी कालवे | १.४२ | १.२८ | — | २.७० | — | — | ०.०५ | २.७५ |
| जिहे काथापूर उसिंयो योजना (धोम—बलकावडी पासून) | ०.५३ | — | — | ०.५३ | — | — | — | ०.५३ |
| कवठे—केंजल उसिंयो | ०.४३ | ०.५३ | ०.३२ | १.२८ | — | — | — | १.२८ |
| वासना उसिंयो | ०.२१ | ०.५७ | ०.१४ | ०.९२ | — | — | — | ०.९२ |
| वांगणा उसियो | ०.२७ | ०.७० | ०.३७ | १.३४ | — | — | — | १.३४ |
| एकुण | ५.८६ | ५.७५ | २.७४ | १४.३५ | २.६४ | ०.२३ | १.०२ | १८.२४ |

नोट : — शासन निर्णय २१/११/२००२ नुसार पाणी नियोजनात व्यक्तिगत उपस्याला मंजुरी देण्याची तरतुद नाही. यातील परिच्छेद एक प्रमाणे कालव्यासाठी जे पाणी वाटप केले आहे, त्यात हे समाविष्ट आहे.

१८.  धोम प्रकल्पात स्त्रोताप्रमाणे चालू व बंद असलेल्या उ. सि. यो.

संदर्भ : – कार्यकारी अभियंता, सातारा सिंचन विभाग, सातारा यांनी प्रतिवादी क्र. ४ व ५ करिता, दि. २९/१२/२०१८ ला दाखल केलेले शपथपत्र.

| अ. क्र. | स्त्रोत | एकुण व्यक्तिगत उसियो | बंद व्यक्तिगत उसियो | चालू व्यक्तिगत उसियो | सिंचित क्षेत्र हेक्टर |
|---|---|---|---|---|---|
| १ | जलाशय | १९३ | ३९ | १५४ | १३२२.३२ |
| २ | उजवा कालवा | ५५० | ४८ | ५०२ | ८५९.६४ |
| ३ | डावा कालवा | १४८६ | १६६ | १३२० | २२९२.१२ |
| एकुण | | २२२९ | २५३ | १९७६ | ४४७४.०८ |

१९.गेल्या ५ वर्षातील धोम बलकावडी आणि धोम प्रकल्पासाठी पाणी वापरासाठी पाणी सोडले व पाण्याची प्रप्ति, ई. ची माहिती.

संदर्भ :– कार्यकारी अभियंता, सातारा सिंचन विभाग, सातारा यांनी प्रतिवादी क्र. ४ करिता दिलेले दि. ११/१०/२०१८ ला दाखल केलेले शपथपत्र

(MM³ मध्ये)

| वर्ष | धोम धरणाचे पाण्याची प्रप्ति | धोम बलकावडीचे पाण्याची प्राप्ती | धोम बलकावडी मध्ये पाणी सोडले | सिंचन | पेयजल | औद्योगिक | बाष्पीभवन | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०११–१२ | ४८३.७९० | १९०.११७ | ९१.४८२ | २९७.६४३ | ०.०३७ | ०.८९८ | २८.३४९ | ३२६.९२७ |
| २०१२–१३ | ३९८.८२९ | १९८.५७० | ९०.७१४ | २४३.६०४ | ०.०३७ | ०.१७९ | २७.६३३ | २७१.४५३ |
| २०१३–१४ | ५३८.९८२ | १९९.८६६ | १०८.७०७ | २५६.८३४ | ०.०३७ | ०.७४५ | २८.४६६ | २८६.०८२ |
| २०१४–१५ | ४३१.३५० | २१३.६३६ | १०७.२२४ | २३३.९४१ | ०.०३७ | ०.६३५ | २६.७५७ | २६१.३७० |
| २०१५–१६ | २१२.९७७ | ९०.६७८ | ४४.०५९ | १०२.९४७ | ४६.१५१ | ०.६४५ | २२.४५३ | १७२.१९६ |
| २०१६–१७ | ५१४.००० | २२३.७५५ | ९६.५०० | २७४.८०५ | ०.०३७ | ०.२४८ | २९.२१२ | ३०४.३०२ |
| २०१७–१८ | ४१०.३७१ | १६५.८९५ | १००.७०६ | २५३.४०० | ०.०३६ | ०.६४२ | २४.८३९ | २७८.९१७ |
| सरासरी | ४२७.१८६ | १८३.२१७ | ९१.३४२ | २३७.५९६ | ६.६२५ | ०.५७० | २६.८१६ | २७१.६०७ |

२०. धोम प्रकल्पाविषयी हंगामागणिक सिंचित क्षेत्र आणि पाण्याचा सिंचनाकरिता वापर, ई. ची माहिती.

संदर्भ :– कार्यकारी अभियंता, सातारा सिंचन विभाग, सातारा यांनी प्रतिवादी क्र. ४ करिता दिलेले दि. ११/१०/२०१८ ला दाखल केलेले शपथपत्र

| अ. क्र. | सिंचन वर्ष | हंगाम | सिंचित क्षेत्र (हजार हेक्टर) (कालवा, उपसा, विहिरी, नदी व नाले धरुन) | पाणी वापर द. ल. घ. मी. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | २०११–१२ | खरीप | १०.७६६ | ३०.६७८ |
| | | रबी | ३१.६५३ | १५५.३८ |
| | | उष्ण हवामान | ७.३१९ | १२७.९४९ |
| | | एकुण | ४९.७३८ | ३१४.००७ |
| २ | २०१२–१३ | खरीप | १.९९३ | ३.४६१ |
| | | रबी | ३१.६४१ | १३८.२ |
| | | उष्ण हवामान | ७.४०५ | १०२.०६ |
| | | एकुण | ४१.०३९ | २४३.७२१ |
| ३ | २०१३–१४ | खरीप | ७.३०८ | ११.५५५ |
| | | रबी | ३१.५७१ | १४३.९८४ |
| | | उष्ण हवामान | ७.२०२ | १०२.१२४ |
| | | एकुण | ४६.०८१ | २५७.६६३ |
| ४ | २०१४–१५ | खरीप | ७.२६५ | ०.०० |
| | | रबी | ३१.९२२ | १४३.६१८ |
| | | उष्ण हवामान | ७.४९९ | ९०.३२५ |
| | | एकुण | ४६.६८६ | २३३.९४३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | २०१५—१६ | खरीप<br>रबी<br>उष्ण हवामान<br>एकुण | १३.७५३<br>२७.४०८<br>०.८०९<br>४१.९७० | ४५.२३३<br>५७.६२५<br>०.१२७<br>१०२.९८५ |
| ६ | २०१६—१७ | खरीप<br>रबी<br>उष्ण हवामान<br>एकुण | ८.४२८<br>३३.०४७<br>११.८५५<br>५३.३३० | ०.००<br>१४९.२३१<br>१२५.५७३<br>२७४.८०४ |
| ७ | २०१७—१८ | खरीप<br>रबी<br>उष्ण हवामान<br>एकुण | २४.१४५<br>५६.१५४<br>१२.०००<br>९२.२९९ | ०.०००<br>१४८.२३०<br>१२५.२३०<br>२७३.४६० |

२१. गेल्या ५ वर्षात धोम प्रकल्पाचे मंजुर केलेले हक्क, मागणी व अपीलार्थीना (पाणी वापर संस्थांना) प्रत्यक्ष दिलेले पाणी, ई. ची माहिती.

संदर्भ:—कार्यकारी अभियंता, सातारा सिंचन विभाग, सातारा यांनी प्रतिवादी क्र. ४ करिता दिलेले दि. ११/१०/२०१८ ला दाखल केलेले शपथपत्र.

पवनपुत्र कालवा पाणी वापर सोसायटी रहिमतपूर, सातारा मंजुर केलेला कोटा(टीएमसी) मधे

| | |
|---|---|
| खरीप | ५२१.०० |
| रबी | १३२३.०० |

| | |
|---|---|
| उष्ण हवामान | ८७४.०० |
| एकुण | २७१८.०० |

| अ. क्र. | सिंचन वर्ष | हंगाम | पाणी वापर संस्थेने मागणी केलेले पाणी टीएमसी | पाणी वापर संस्थेला दिलेले पाणी टीएमसी | आवर्तनाची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | २०११–१२ | १.खरीप | १९३.५५ | ३०३.४१ | १ |
| | | २.रबी | १७६४.०० | ९२९.८२ | ४ |
| | | ३.उष्ण हवामान | ८०६.०५ | ८६८.६५ | ४ |
| | | ४.एकुण | २७६३.६० | २१०१.८८ | ९ |
| २ | २०१२–१३ | १.खरीप | ०.०० | ०.०० | ० |
| | | २.रबी | १३२७.९० | ६१६.१९ | ३ |
| | | ३.उष्ण हवामान | ६२७.२० | ४२८.२१ | ३ |
| | | ४.एकुण | १९५५.१० | १०६४.४० | ६ |
| ३ | २०१३–१४ | १.खरीप | ०.०० | ०.०० | ० |
| | | २.रबी | ८५९.९५ | ९७२.६५ | ४ |
| | | ३.उष्ण हवामान | १११४.७५ | ७३१.६२ | ३ |
| | | ४.एकुण | १९७४.७० | १७०४.२७ | ७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | २०१४–१५ | १.खरीप | ०.०० | ०.०० | ० |
| | | २.रबी | १०७८.०० | ९५१.८४ | ४ |
| | | ३.उष्ण हवामान | ८७४.६५ | ५२६.०८ | ३ |
| | | ४.एकुण | १९५२.६५ | १४७७.९२ | ७ |
| ५ | २०१५–१६ | १.खरीप | ३७९.७५ | २०३.०९ | १ |
| | | २.रबी | ४७०.४० | ४७७.१५ | १ |
| | | ३.उष्ण हवामान | ०.०० | ०.०० | ० |
| | | ४.एकुण | ८५०.१५ | ६८०.२४ | २ |
| ६ | २०१६–१७ | १.खरीप | ०.०० | ०.०० | ० |
| | | २.रबी | ८८४.४५ | १०७४.१९ | ३ |
| | | ३.उष्ण हवामान | १३६९.५५ | ११५०.०४ | ३ |
| | | ४.एकुण | २२५४.०० | २२२४.२३ | ६ |
| ७ | २०१७–१८ | १. खरीप | ०.०० | ०.०० | १ |
| | | २. रबी | १६५१.३० | १५१९.०० | ३ |
| | | ३. उष्ण हवामान | ११६६.२० | ४६०.६० | २ |
| | | ४. एकुण | २८१७.५० | १९७९.६० | ५ |

कालभैरव कालवा पाणी वापर सोसायटी, रहिमतनगर, सातारा मंजुर केलेला कोटा (टीएमसी)

| | |
|---|---|
| खरीप | ६३५.०० |
| रबी | १६१७.०० |

| | |
|---|---|
| उष्ण हवामान | १०७०.०० |
| एकुण | ३३२२.०० |

| अ. क्र. | सिंचन वर्ष | हंगाम | पाणी वापर संस्थेने मागणी केलेले पाणी टीएमसी | पाणी वापर संस्थेला दिलेले पाणी टीएमसी | आवर्तनाची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | २०११—१२ | १.खरीप | ३४३.०० | १२२.५० | १ |
| | | २.रबी | १२४९.५० | १०२६.५५ | ४ |
| | | ३.उष्ण हवामान | ६६१.५० | ४८७.५५ | ३ |
| | | ४.एकुण | २२५४.०० | १६३६.६० | ८ |
| २ | २०१२—१३ | १.खरीप | ०.०० | ०.०० | ० |
| | | २.रबी | ७७४.२० | ७८४.०० | ३ |
| | | ३.उष्ण हवामान | ६६१.५० | ५३९.०० | ३ |
| | | ४.एकुण | १४३५.७० | १३२३.०० | ६ |
| ३ | २०१३—१४ | १.खरीप | ०.०० | ०.०० | ० |
| | | २.रबी | १२४२.१५ | १००५.०० | ४ |
| | | ३.उष्ण हवामान | ८८२.०० | ५१६.९५ | ४ |
| | | ४.एकुण | २१२४.१५ | १५२१.९५ | ८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | २०१४–१५ | १.खरीप | २३२.७५ | ०.०० | ० |
| | | २.रबी | १६६६.०० | ५८८.०० | ३ |
| | | ३.उष्ण हवामान | ५८८.०० | ३८७.१० | ३ |
| | | ४.एकुण | २४८६.७५ | ९७५.१० | ६ |
| ५ | २०१५–१६ | १.खरीप | १९६.०० | ०.०० | ० |
| | | २.रबी | ३७९.७५ | २४५.०० | १ |
| | | ३.उष्ण हवामान | ०.०० | ०.०० | ० |
| | | ४.एकुण | ५७५.७५ | २४५.०० | १ |
| ६ | २०१६–१७ | १.खरीप | ०.०० | ०.०० | ० |
| | | २.रबी | १३१३.२० | ५०७.१५ | ३ |
| | | ३.उष्ण हवामान | ५८८.०० | ४४५.९० | ३ |
| | | ४.एकुण | १९०१.२० | ९५३.०५ | ६ |
| ७ | २०१७–१८ | १.खरीप | ०.०० | ०.०० | ० |
| | | २.रबी | ७८८.९० | ५७८.२० | ३ |
| | | ३.उष्ण हवामान | ४२८.७५ | ४१४.०५ | ३ |
| | | ४.एकुण | १२१७.६५ | ९९२.२५ | ६ |

चंद्रगिरी कालवा पाणी वापर सोसायटी, रहिमतपूर, सातारा

मंजुर केलेला कोटा (टीएमसी)

| | |
|---|---|
| खरीप | ६४५.०० |
| रब्बी | १६६०.०० |
| उष्ण हवामान | ११२०.०० |
| एकुण | ३४२५.०० |

| अ. क्र. | सिंचन वर्ष | हंगाम | पाणी वापर संस्थेने मागणी केलेले पाणी टीएमसी | पाणी वापर संस्थेला दिलेले पाणी टीएमसी | आवर्तनाची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | २०११–१२ | १.खरीप | ४९०.०० | ३०१.३५ | २ |
| | | २.रबी | १०७८.०० | ५६५.९५ | ३ |
| | | ३.उष्ण हवामान | ५१४.५० | ५४१.४५ | ४ |
| | | ४.एकुण | २०८२.५० | १४०८.७५ | ९ |
| २ | २०१२–१३ | १.खरीप | ०.०० | ०.०० | ० |
| | | २.रबी | ७३९.९० | ७३०.१० | ३ |
| | | ३.उष्ण हवामान | ५५१.२५ | ५२१.८५ | ३ |
| | | ४.एकुण | १२९१.२५ | १२५१.९५ | ६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | २०१३–१४ | १.खरीप | ०.०० | ०.०० | ० |
| | | २.रबी | ११७६.०० | ९५५.५० | ४ |
| | | ३.उष्ण हवामान | ७३५.०० | ४९९.८० | ४ |
| | | ४.एकुण | १९११.०० | १४५५.३० | ८ |
| ४ | २०१४–१५ | १.खरीप | १९६.०० | ०.०० | ० |
| | | २.रबी | १६०७.२० | ८५७.५० | ४ |
| | | ३.उष्ण हवामान | ५४३.९० | ३४३.०० | ३ |
| | | ४.एकुण | २३४७.१० | १२००.५० | ७ |
| ५ | २०१५–१६ | १.खरीप | १७६.४० | १२७.४० | १ |
| | | २.रबी | ३६५.०५ | २०८.२५ | १ |
| | | ३.उष्ण हवामान | ०.०० | ०.०० | ० |
| | | ४.एकुण | ५४१.४५ | ३३५.६५ | २ |
| ६ | २०१६–१७ | १.खरीप | ०.०० | ०.०० | ० |
| | | २.रबी | ११८८.२५ | ७६९.३० | ३ |
| | | ३.उष्ण हवामान | ५९५.३५ | ५०२.२५ | ३ |
| | | ४.एकुण | १७८३.६० | १२७१.५५ | ६ |
| ७ | २०१७–१८ | १.खरीप | ०.०० | ०.०० | ० |
| | | २.रबी | १२२९.९० | १००६.९५ | ३ |
| | | ३.उष्ण हवामान | ६१९.८५ | ५८८.०० | ३ |
| | | ४.एकुण | १८४९.७५ | १५९४.९५ | ६ |

**सत्यस्थिति :—**

२२. पाणी वापर संस्थांना धोम डावा किनारा कालव्यातुन त्याच्या पुच्छ शेवट भागाला, त्यांना जो हक्क महाराष्ट्र सिंचन पध्दतीने शेतकऱ्यांकडुन व्यवस्थापन अधिनियम, २००५ (एमएमआयएसएफ) अधिनियम अन्वये मिळाला आहे, त्यापेक्षा कमी पाणी देण्याच्या विषयावरुन केलेल्या अपीलाशी हे प्रकरण संबंधित आहे.

२३. धोम धरणाला २ कालवे आहेत; १) धोम डावा किनारा कालवा (डीएलबीसी) ११३ किमी लांबीचा असुन २) धोम उजवा किराना कालवा (डीआबीसी) ६६ किमी. लांब आहे.

२४. अपीलार्थी ही डीएलबीसी च्या पुच्छ शेवटावर असलेली संस्था आहे. या पाणी वापर संस्था एमएमआयएमएफ, अधिनियम, २००५ अंतर्गत स्थापित झाल्या आहेत. या अपीलार्थींनी कार्यकारी अभियंता, धोम कालवा विभाग यांच्या बरोबर केलेल्या करारावर सहया केल्या आहेत, पण त्या कराराचे नवीनीकरण केलेले नाही.

२५. ज्या ३ अपीलार्थींना पाण्याचे हक्क प्राप्त झाले आहेत, त्या संस्था आहेत; १) पवनपुत्र कालवा पाणी वापर सोसायटी, रहिमतनगर, सातारा २) कालभैरव कालवा पाणी वापर सोसायटी, रहिमतनगर, सातारा अणि ३) चंद्रगिरी कालवा पाणी वापर सोसायटी, रहिमतनगर, सातारा. त्यांना ते हक्क अनुक्रमे २७१८, ३३२२ व ३४२५ टीएमसी साठी मिळाले आहेत.

२६. ही स्विकारलेली बाब आहे की, त्यांना त्यांच्या हक्कापेक्षा, धोम धरणात पुरेसे पाणी (यील्ड) असुनही, कमी पाणी मिळत आहे.

२७. या अपीलावर योग्य तो न्याय मिळावा म्हणुन प्राधिकरणाला हे प्रकरण विचारार्थ घेण्यासाठी कांही संबंधित सत्य परिस्थितिचा विचार करणे आवश्यक वाटते, त्या बाबी खाली दिल्या आहेत.

२७.१) कृष्णा प्रकल्पाला १९६६ मधे प्रशासनिक मान्यता प्राप्त झाली असुन, धोम धरण या कृष्णा नदीवरील या प्रकल्पाचा एक भाग आहे. कृष्णा प्रकल्पाचे २ टप्पे आहेत. पहिल्या टप्प्यात दोन धरणे, धोम धरण व कान्हेर धरण असुन त्यांच्या कालवा यंत्रणेव्दारे ७४,००० हेक्टर क्षेत्रात सिंचनाची सोय झाली आहे; व त्यांची नियोजित वार्षिक पाणी वापर २३.७६५ टीएमसी आहे. कृष्णा प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात ५ उपसा सिंचन योजना आहेत, त्या म्हणजे, कवडे केंजाल, वासना, वांगना, धनगरवाडी आणि हंबरवाडी. पहिल्या ३ योतनाा धोम डावा किनारा कालव्यावर असुन बाकीच्या दोन आरफळ कालव्यावर आहेत. कृष्णा प्रकल्प टप्पा २ चे नियोजित वार्षिक पाणी वापर ५.१५ टीएमसी चे आहे.

२७.२) धोम धरणाचे बांधकाम १९६८—६९ मधे सुरु होवून ते १९७६ मधे संपले. त्याची वितरण यंत्रणा १९८७ मधे पुर्ण झाली. धरणाची चल साठवण क्षमता ३३१.१० दलघमी (११.६९ टीएमसी) आहे.

२७.३) त्यानंतर, महाराष्ट्र राज्याला मिळालेल्या ५९९ टीएमसी पाण्याच्या हिस्स्याचा पुर्णपणे उपयोग व्हावा म्हणुन, काही अतिरिक्त योजना मंजुर केल्यात. सिंचनाचा लाभ अधिकाधिक क्षेत्राला व्हावा म्हणुन या प्रकल्पाचे अवलंबीत्व ७५ वरुन ५०% वर आणले.

२७.४) जिहे—काथापूर उ. सिं. योजना कृष्णा प्रकल्पाचा भाग असुन ती १९७७ मधे मंजुर केली. त्यात ३.१७ टीएमसी पाण्याचा वापर व्हायचा असुन त्यामुळे १७,००० हेक्टर क्षेत्राला त्याचा लाभ खटाव तालुक्यात व १५,८०० हेक्टर लाभ मान तालुक्यात

मिळेल. एकुण लाभक्षेत्र या योजने २७,५०० हेक्टर आहे. खटाव व मान हे दोन्ही तालुके दुष्काळग्रस्त आहेत.

२७.५) त्याचप्रमाणे, धोम बलकावडी योजना १९९५–९६ मधे मंजुर करण्यात आली. यामधे प्रारंभी पिकांचा आकृतिबंध ४ महिन्याचा होता. नंतर वर्ष २००० मधे या योजनेचा पिकांचा आकृतिबंध ८ महिन्याचा केला. ज्यामधे निरा देवघर प्रकल्पाचे ०.९३ टीएमसी पाणी मिळणार होते. धोम बलकावडी च्या ४ थ्या सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार, जी ३० मे २०१७ ला मंजुर केली, सिंचन पाणी वापर या योजनेचा ३.६३ टीएमसी झाला आहे. ज्यामधे २.७० टीएमसी धोम बलकावडी व ०.९३ टीएमसी निरा देवघर ची साठवण समाविष्ट आहे. ४ थ्या सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार, योजनेचे सिंचित क्षेत्र १८,००० हेक्ट. आहे. लाभ मिळालेले क्षेत्र भोर (१०५० हेक्ट), खंडाला (४३०० हेक्ट.) , फलटण (१२,७५० हेक्ट.) हे आहेत. सध्या ०.९३ टीएमसी पाणी निरा देवघर मधुन मिळण्याचे कार्य अजुन हाती घेतले नाही.

२७.६) धोम बलकावडी योजनेत सध्याच्या धोम धरणाच्या वरच्या प्रवाहात १३ किमी. साठवण क्षमतेचे, ज्यामधे अवलंबित्वा ची टक्केवारी ७५% वरुन ५०% करुन, निर्माण केली आहे. ५०% अवलंबित्वावर पाण्याची उपलब्धतता १८.०३ टीएमसी आणि ७५% १४.२५ टीएमसी आहे. त्यामुळे अवलंबित्व कमी केल्यामुळे अतिरिक्त ४.०८ टीएमसी पाणी उपलब्ध होणार आहे. धोम बलकावडी मधे साठवलेले पाणी धोम धरणात सोडले जाते. धोम बलकावडीचे कालवे धोम धरणातुन सुरु होतात. एकुण व चल साठवण क्षमता धोम बलकावडी धरणाची अनुक्रमे ४.०८ व ३.९६ टीएमसी आहे. धोम बलकावडी जलाशयातुन वार्षिक पाण्याचा वापर ३.९६ टीएमसी आहे ज्यामधे धोम

बलकावडी कालव्यासांठी २.७० टीएमसी, च ०.६४ टीएमसी ५ उ. सि. योजनेसाठी जे कृष्णा प्रकल्प टप्पा–२ मधे समाविष्ट आहे, ०.५३ टीएमसी जिहे–काथापुर योजनेसाठी व ०.९ बाष्पीभवनासाठी सम्मिलित आहे. धोम बलकावडी कालवा यंत्रणेचा नियोजित वार्षिक पाणी वापर ३.६३ टीएमसी झाला आहे. ज्यामधे २.७० टीएमसी धोम बलकावडी व ०.९३ टीएमसी निरा देवघर ची साठवण समाविष्ट आहे.

२७.७) राज्य शासनाने दि. २०/१०/२००१ च्या पत्राने केंद्रिय जल आयोगाला कळविल्याप्रमाणे ५९९ टीएमसी पाणी वापराचा योजनेच्या अंतर्गत, जो कृष्णा पाणी तंटा न्यायाधिकाराने कोणत्याही पाणी–वर्षाकरिता ठरवला आहे, त्याप्रमाणे जिहे–काथापूर उ. सि. योजना व धोम बलकावडी धरण सुध्दा कृष्णा प्रकल्पाचा भाग आहे. एकुण पाणीवापर कृष्णा प्रकल्पासाठी ज्यात जिहे–काथापूर उ. सि. योजना व धोम बलकावडी धरण सुध्दा समाविष्ट आहेत. त्यामध्ये एकुण ५९९ टीएमसी पाणी वापरापैकी, ३४.८३५ टीएमसी पाण्याचा वापर होतो. घटकगणिक नियोजित पाणी वापर परिच्छेद २६ मधे दाखवला आहे. यासाठी जे पाण्याचे स्त्रोत आहेत, ते असे आहेत.

| | |
|---|---|
| धोम जलग्रहण क्षेत्र | १८.०३ टीएमसी |
| कान्हेर जलग्रहण क्षेत्र | १२.६६ टीएमसी |
| स्वतंत्र जलग्रहण क्षेत्र जिहे काथापूर उपसा बिंदु पर्यंत | ३.१७ टीएमसी |
| पुनर्जीवित प्रवाह | ०.९९ टीएमसी |
| एकुण | ३४.८५ टीएमसी |

२७.८) धोम जलग्रहण क्षेत्राचे जे या प्रकरणाशी संबंधित आहे, कृष्णा प्रकल्पामधे, नियोजित पाणी वापर १८.२४ टीएमसी आहे. याचा तपशील परिच्छेद १७ मधे दाखवला आहे.

यासाठी जे पाण्याचे स्त्रोत आहेत, ते असे आहेत.

| | |
|---|---|
| ५० अवलंबित्वावर धोम धरणापर्यंत धोम जलग्रहण क्षेत्राची पाणी उपलब्धता | १८.०३ टीएमसी |
| धोम उजवा किनारा कालव्याला कुडाली नदीवर हुमगावला बांधलेल्या बंधाऱ्याला मिळणारे पाणी | ०.१४ टीएमसी |
| नागेवाडी धरण | ०.०८९ टीएमसी |
| एकुण | १८.२५९ टीएमसी |

२७.९) मध्यंतरी, २२२९ व्यक्तिगत उपसा सिंचन यंत्रणा, शा. नि. २१/११/२००२ नुसार मंजुर केले आहेत. त्यापैकी १९७६ कार्यरत असुन त्यामुळे ४४७४ हेक्ट. क्षेत्राला लाभ होतो. परंतु या व्यक्तिगत उ. सि. योजनांकरिता पाणी नियोजनात वेगळी तरतुद नाही. शा. नि. च्या परिच्छेद १ प्रमाणे, त्यांना यासाठी कालव्याला वापरासाठी सिंचनाच्या पाण्यात कपात करावी लागते.

२७.१०) त्याचप्रमाणे, सदर शा. नि. तील तरतुदीप्रमाणे, जयलक्ष्मी सिंचन योजनेत ०.३०६ टीएमसी पाणी वापर होतो. ज्यामुळे ८५७ हेक्टर क्षेत्र कृष्णा किनाऱ्यावर सिंचित होते. हा पाणी वापर देखील पाणी नियोजनात समाविष्ट नाही.

२७.११) कृष्णा प्रकल्प ज्यामधे धोम, कान्हेर व जिहे काथापूर उ. सि. यो. येतात, त्याचा पाणी वापर ३२.०८५ टीएमसी आहे. सिंचन, पेयजल व औद्योगिक वापरासाठी प्रकल्प नियोजनात जी तरतुद आहे ती, अनुक्रमे २६.८६८, ४.८० व ०.४१७ टीएमसी आहे.

२७.१२) नियोजित वार्षिक वापर, धोम प्रकल्पासाठी, जो कृष्णा प्रकल्प टप्पा–१ चा घटक आहे. (बाष्पीकरण धरुन) ११.४२ टीएमसी आहे. त्याचा वापर सिंचन ७.५८ टीएमसी, पेयजल २.६४ टीएमसी , ०.२३ टीएमसी औद्योगिक व बाष्पीकरण ०.९७ टीएमसी आहे.

२७.१३) ही दोन्ही धरणे नदीवर टप्प्याटप्याने बांधली आहे. धोम धरणाचे काम १९६६ ला तर धोम–बलकावडी चे काम, अतिरिक्त पाणी असल्याचे लक्षात आल्यावर, १९९६ मधे बांधकामाला सुरुवात झाली. धोम बलकावडीत पाणी वाहुन आणणारे जलग्रहण (पाणलोट) क्षेत्र तथा धोमचे क्षेत्र जवळपास साररखे आहे. धोम बलकावडी क्षेत्राच्या खालच्या प्रवाहाचे स्वतंत्र जलग्रहण क्षेत्र फार कमी आहे. धोम धरणात जास्तीचे पाणी लक्षात घेऊन खर म्हणजे धोम बलकावडी प्रकल्पाचे, नियोजन केले. त्यामुळे धोम संकुलाला पाणी व्यवस्थापनासाठी एक एकक समजणे जास्त आवश्यक आहे.

२७.१४) धोम बलकावडी स्वतंत्र कालवा प्रणाली आहे, जी धोम धरणातुन सुरु होते व १८००० हेक्टर क्षेत्रासाठी निरा देवघर उपखोऱ्यातील भोर, खंडाला व फलटण तालुक्याला पाणी पुरवते. धोम बलकावडी धरणाचे पाणी प्रथम धोम धरणात सोडले जाऊन नंतर ते धोम बलकावडी कालवा यंत्रणेत सोडले जाते.

२७.१५) धोम कालवा योजना जुनी आहेत धोम बलकावडी कालवा योजना नवी आहे. धोम डावा किनारा कालवा यंत्रणेची पाणी सोडण्याची क्षमता बरीच कमी झाली आहे, कारण त्याची पाहिजे तशी देखरेख झाली नाही. त्यामुळे कालव्यावरील बांधकाम रचना देखील ढासळत

आहे, त्यामुळे त्यातुन प्रवाहित होणाऱ्या पाण्याची हानी जास्त आहे. कालव्यावरील बांधकाम रचना व्यवस्थित नसेल तर समन्यायी वितरण शक्य होणार नाही. कालव्याची व त्यावरील रचनांची कित्येक वर्षे बरोबर देखभाल, निधीच्या कमतरतेमुळे होऊ शकली नाही. त्यामुळ कालव्यातुन ठरवल्याप्रमाणे पाणी प्रवाहित न झाल्यामुळे पाण्याचा हिस्सा, विशेषता पुच्छ टोकांच्या शेवटच्या भागतील हक्कदारांना मिळत नाही. जो पर्यंत कालव्याची प्रवाहित क्षमता पुर्ववत होत नाही, धोम डाव्या किनारा कालव्याच्या पुच्छ टोकाकडे असणाऱ्यांना भागांना पाणी देता येणार नाही.

२७.१६) ज्या २२२९ उ. सिं. योजनेला मंजुरी दिली आहे, त्यापैकी १९७६ कार्यरत असुन त्यामुळे ४४७४ हेक्ट. क्षेत्राला लाभ होतो. परंतु या व्यक्तिगत उ. सि. योजनांकरिता पाणी नियोजनात वेगळी तरतुद नाही; तसेच जयलक्ष्मी उपसा सिंचन योजनेसाठी सुध्दा वेगळी तरतुद नाही. या परवानग्या शा. नि. ज. सं. वि/किरकोळ १०.०१/(३७८/२००१)/सिं. व्य. (निती) दि. २१/११/२००२ अन्वये दिल्या आहेत. या योजनेंमुळे अपीलार्थी पाणी वापर संस्थांचे पाण्याचे हक्क विपरितपणे बाधीत झाले आहे. असे दिसुन आले की, धोम यंत्रणेमधे (धोम व धोम बलकावडी) सरासारी प्रवाहित होणाऱ्या पाण्याची गरज २००८–०९ ते २०१७–१८ दरम्यान ५८४.७० द.ल घ.मी. (२०.६४ टीएमसी); जेंव्हा की नियोजित पाणी वापर केवळ ५१६.५० द. ल. घ. मी. (१८.२४ टीएमसी) होता. असे देखील आढळुन आले की, धोम धरणाची चल साठवण ३० जुन ला (पाणी वर्षाअखेर) ५७.५० द. ल. घ. मी. (अंदाजे २.० टीएमसी) आहे.

२७.१७) सध्या धोम कालवा यंत्रणा, जललक्ष्मी योजना तथा इतर व्यक्तिगत उ. सिं. यो. पुरेपूर कार्यरत आहेत. ३ उपसा सिंचन योजना, केवठे केंजळ, वासना, वांगना चालू झाल्या

आहेत, पण त्या पूर्ण क्षमतेने काम करित नाही. जिहे–काथापूर उ. सिं. योजना अजुन सुरु झाली नाही. जेंव्हा धोम डावा किनारा कालवा व जिहे काथापूर योजना त्यांच्या पुर्ण क्षमतेने (रचित) कार्यरत होतील तेंव्हा धोम यंत्रणेवर कितीतरी अधिक दाब वाढलेला असेल.

## मुद्दे सांचेबध्द करणे

२८. प्रकरण समजुन घेतल्यावर, अपीलावर जो आदेश पीडीआरओ ने जारी केला आहे, पक्षकारांनानी सादर केलेले त्यांचे विचार तसेच प्रकरणाची कागदपत्रे जी अभिलेखात उपलब्ध आहेत; हे सर्व तपासल्यावर प्राधिकरणाऱ्या विचारार्थ पुढील मुद्दे समोर आले आहेत.

१) **पाणी वापर संस्था ज्यांनी अपील केले आहे. त्यांना, धोम बलकावडी प्रकल्पाच्या, धोम प्रकल्पाचे जे सर्व लाभार्थी आहेत, त्यांचे तर्फे, प्रकल्पाच्या पाणी–नियोजनाला आव्हान देण्याचा, हक्क आहे काय?**

२) **पाणी वापर संस्थांना म्हणजे अपीलार्थींना त्यांच्या कायदेशीर हक्कापेक्षा कमी पाणी मिळते काय? जर तसे असेल तर त्यासाठी कोणती प्रमुख कारणे आहेत; त्यावर संभावनीय उत्तर शोधता येईल काय?**

३) **अपीलार्थींनी जसा दावा केला आहे, त्याप्रमाणे धोम सिंचन कालवा यंत्रणेला १०.५७ टीएमसी पाणी मिळण्याचा कायदेशीर हक्क आहे काय?**

४) **जोपर्यंत धोम धरण त्यांच्या ७५% क्षमतेपर्यंत भरत नाही तोपर्यंत धोम–बलकावडी कालव्यात पाणी सोडण्यास मनाई करणे योग्य आहे काय?**

**५) धोम व धोमबलकावडी जलाशयांना जे पाणी मिळते त्याच्या वितरणासाठी काम करण्याकरिता मार्गदर्शन करणे आवश्यक आहे काय? जर तसे असेल तर काय मार्गदर्शन करता येईल?**

**६) रबी व उष्ण हवामानात धोम बलकावडी मधे पाणी सोडण्यास मनाई करणे न्यायोचित ठरते काय?**

**७) कमी पावसाच्या वर्षात धोम बलकावडी कालव्यात पाणी सोडण्यावर बंदी घालणे न्यायोचित ठरते काय?**

**८) दरवर्षी २८ फेब्रुवारी नंतर, कालव्यातुन पाणी घेण्यावर बंदी घालणे न्यायोचित ठरते काय?**

**९) पीडीआरओ च्या प्रकरण क्र. २/२०१७ च्या दि. २५ मे २०१८ च्या आदेशाला, अपीलार्थींनी जे आव्हान केले आहे, त्यात ढवळा ढवळ करणे आवश्यक आहे काय?**

**१०) अपीलार्थींना न्याय मिळावा या हेतुने एखादे विशेष मार्गदर्शन करता येई अथवा अनुतोष देण्याची गरज आहे काय?**

**प्राधिकरणाचे निष्कर्ष**

२९) वर चर्चिलेल्या मुद्यांवर, प्राधिकरणाचे निष्कर्ष खाली दिले आहेत:—

१) पाणी वापर संस्था ज्यांनी अपील केले आहे. त्यांना, धोम बलकावडी प्रकल्पाच्या, धोम प्रकल्पाचे जे सर्व लाभार्थी आहेत, त्यांचे तर्फे, प्रकल्पाच्या पाणी—नियोजनाला आव्हान देण्याचा, हक्क आहे काय?

अ) प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी सांगितले की अपीलार्थी हे निम्न स्तरावरील पाणी वापर कर्ते आहेत. ते धोम डावा कि. कालवा किंवा धोम प्रकल्पाचे स्तरावरील पाणी

वापर कर्ते नाहीत. त्यामुळे धोम बलकावाडी प्रकल्पाच्या पाणी – नियोजनाला, धोम प्रकल्पाच्या सर्व लाभार्थींच्या मार्फत, आव्हान देणे त्यांच्या कार्यक्षेत्रात बसत नाही.

ब) प्रतिवादी क्र. ६ ने सुध्दा प्राधिकरणासमोर युक्तिवाद १९ नोव्हेंबर २०१८ ला केला की, अर्जाची व्याप्ति मर्यादित करायला पाहिजे ती म्हणजे पाणी वापर संस्थांची व्यथा दुर करणे व धोम प्रकल्पामधे त्यांचा असलेला हक्क, एवढया पुरता विचार करणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष** (१) या प्राधिकरणाचे विचारांती असे मत आहे की, अपीलार्थींना त्यांचा योग्य असलेला हिस्स्यावर दाव्यावर हक्क सांगण्याचा अधिकार आहे. जरी एकंदरीत पाणी–नियोजनाशी त्यांचा संबंध नसलातरी जोपर्यंत त्यांच्या पाण्यावर कायदेशीर हक्क आहे, त्यामुळे प्राधिकरणाला उद्‌भवेलेल्या मुद्यांमधे, विशेषतः अपुरा होणारा पाणी पुरवठा, आणि त्याची कारण मिमांसा शोधणे, जोपर्यंत अपीलार्थींची व्यथा, त्रास दुर होत नाही. त्यामुळे, या मुद्याचे उत्तर, वर सांगितल्याप्रमाणे होकारार्थी येते.

**२) काय पाणी वापर संस्थांना म्हणजे अपीलार्थींना त्यांच्या कायदेशीर हक्कापेक्षा कमी पाणी मिळते काय? जर तसे असेल तर त्यासाठी कोणती प्रमुख कारणे आहेत; त्यावर संभावनीय उत्तर शोधता येईल काय?**

अ) अपीलार्थींनी त्याच्या ५ सप्टेंबर २०१८ च्या युक्तिवादात, सुनावणी दरम्यान, लक्षात आणुन दिले की, त्यांना कायदेशीर हक्काच्या पाण्याचा पुर्ण हिस्सा मिळत नाही.

ब) प्राधिकरणाने ठेवलेल्या प्रश्नांची अनुपालना करतांना, सुनावणी दरम्यान, म्हणजे ५ सप्टेंबर २०१८ ला, प्रतिवादी क्र. ४ नी तसेच दि. ११/१०/२०१८ चे शपथपत्र मान्य केले की अपीलार्थींना त्याच्या कोटयापेक्षा कमी पाणी मिळाले आहे.

पहिल्या भागावरील निष्कर्ष (२) :— हे प्राधिकरण जी माहिती व अभिलेख समोर ठेवले आहे, तसेच त्यांना हे देखील आढळुन आले की जरी धोम कालव्याला त्याच्या नियोजित पाणी वापरापेक्षा जास्त पाणी म्हणजे ७.५८ टीएमसी (२१४ दलघमी), २०११ पासुन उपलब्ध करुन दिले (अपवाद २०१५—१६ चा जेंव्हा कमी पाऊस पडला) तरी देखील अपीलार्थीना त्यांचा कायदेशीर हक्कापेक्षा कमी पाणी मिळाले. त्यामुळे पहिल्या भागाचे उत्तर होकारार्थी येते.

क) अपीलार्थीनी त्यांच्या अपीलात व युक्तिवादात सादर केलेल्या माहिती मधे कमी पाणी मिळण्याची कारणे, खालीलप्रमाणे दिली आहेत.

क—१) धोम बलकावाडी कालव्यात जास्त पाणी वळवले.

क—२) कालव्याच्या उपस्यांमधुन उष्ण हवामानाच्या हंगामात पाणी उचलले, जरी त्यांना फक्त खरीप व रबी हंगामासाठी परवानगी होती.

ड) प्रतिवादी क्र. ४ त्यांच्या युक्तिवादात तसेच दिलेल्या माहितीत प्राधिकरणाला कमी पाणी अपीलार्थींना मिळाल्याची कारणे सांगितली आहे.

ड—१) अपीलार्थी पाणी वापरसंस्था धोम डावा किनारा कालव्याच्या, पुच्छ टोकावर आहेत.

ड—२) धोम धरण १९७६ मधे पुर्ण झाले व त्याचे सिंचन सुरु झाले. त्याची कालवा यंत्रणा १९८७ मधे पुर्ण झाली. याप्रमाणे, धोम कालवा यंत्रणा फार जुनी आहे व त्याची पाणी वहनाची क्षमता, अपुऱ्या देखभालीमुळे, कमी झाली आहे. त्याची वहन क्षमता

कमी झाल्याने आवर्तनाला बराच वेळ लागतो, परिणामी आवर्तनाची संख्या कमी होऊन गळतीमुळे पाण्याची बरीच हानी होते. तसेच कालव्यावरील एकुण ६२९ बांधकामापैकी ५२२ मधे दुरुस्ती चालु असते. पुरेशी तसेच वेळेवर कालव्याची देखरेख आवश्यक निधी उपलब्ध होऊ न शकल्यामुळे, होऊ शकली नाही.

डी—३) प्रकल्पाचे लाभार्थी हे पाण्याचे नियमितपणे बील भरण्यास नाखुष असतात. साखर कारखानदार हे लाभार्थींच्या उसाच्या बीलातुन पाण्याच्या बिलाचे पैसे कापण्यास सहकार्य करित नाही. परिणामी पाण्याची बिलाची वसुली फारच कमी असते.

डी—४) कर्मचारी अपुरे असल्यामुळे सिंचन व्यवस्थापन अकार्यक्षम झाले आहे. विभागात न भरलेल्या जागा ५८% आहे. २४२ पैकी केवळ ७६ जागा भरल्या आहेत.

डी—५) कालव्याच्या उ. सिं. योजना उष्ण हवामानात कार्यरत असतात. जरी त्यांचे नियोजन फक्त ८ महिन्याकरिता असले तरी कालव्याच्या उ. सिं. योजना उष्ण हवामानात कार्यरत असतात. कर्मचाऱ्यांच्या अपुऱ्या संख्येमुळे अनधिकृत पाणी उपस्यावर परिणामकारक नियंत्रण ठेवणे शक्य होत नाही.

**बाकी असलेल्या मुद्यावरील निष्कर्ष (२) :** जी माहिती अभिलेखातुन प्राप्त झाली आहे. त्यावरुन प्राधिकरणाला दिसुन आले की अपीलार्थींना त्यांचा कायदेशीर पाण्याचा कोटा न मिळण्याची प्रमुख कारणे ज्यामुळे, त्यांच्या पाणी पुरवठयावर विपरित परिणाम झाला आहे, ती अशी आहेत.

१) जलग्रहण क्षेत्रात चांगला पाऊस झाल्यामुळे वर्षभराच्या बऱ्याच काळात पाण्याचे नियोजित वापर करण्यासाठी धरणात बरेच पाणी असते. तथापि, कालव्याची पाणी प्रवाहित करण्याची क्षमता अपुऱ्या देखरेखी मुळे, निधीची त्यासाठी कमतरता भासत असल्यामुळे, त्याच्या ठरलेल्या क्षमतेपेक्षा बरीच कमी झालेली आहे. पाण्याच्या नियोजनामधे जी पाण्याची हानी लक्षात घेतली

होती, त्यापेक्षा कितीतरी जास्त हानी सध्या होत आहे; कारण कालव्याच्या अपुऱ्या देखरेखीमुळे, त्यावरील बऱ्याचशा बांधकामाचे नुकसान झाले आहे, त्यामुळे अपीलार्थींच्या पाणी हक्कावर, याचा विपरित परिणाम होऊन, बाधा निर्माण झाली आहे.

राज्य जल निती (त्यातील परिच्छेद ९) मधे जबाबदार असणाऱ्या प्राधिकरणाला ज्यात नदी खोरे अभिकरण येते, निर्देश देते की, पाण्याच्या सुविधा चालु ठेवण्यासाठी पुरेपुर मोबदला देणारी तसेच समयोचित व तांत्रिकदृष्टया निकोप असणाऱ्या देखभालीच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी झाली पाहिजे. प्राधान्याने याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

२) अपीलार्थी पाणी वापर संस्था धोम डावा कालवा किनाऱ्याच्या (डीएलबीसी) टोकावर स्थित आहे.

३) उपसा सिंचन, योजना एकुण १९७६ (१५४ जलाशयावर, ५०२ डीएलबीसी वर, व १३२० डीआरबीसी वर) आहेत त्यामुळे ४४७४ हेक्ट. क्षेत्र सिंचित होते जे नियोजित सिंचनाच्या म्हणजे ३२६८५ हे. च्या १३.५६ टक्के आहे. तसेच जल लक्ष्मी योजना ८५७ हेक्ट. क्षेत्राला पाणी पुरवठा करित आहे, (वार्षिक पाणी वापर ८.६७ द.ल.घ.मी./०.३०६ टीएमसी) व कार्यरत आहे. या व्यक्तिगत उ. सिं. योजना व जल लक्ष्मी योजनेला शा. नि. दि. ३१/११/२००२ अन्वये परवानगी दिलेली आहे. तथापि, यांच्या पाणी वापराबद्दल पाण्याच्या नियोजनांत विचार केलेला नाही. यांच्यामुळे अपीलार्थीचे कायदेशीर हक्क विपरितपणे बाधित होत आहेत.

४) परिणामकारक पाणी व्यवस्थापनासाठी लागणाऱ्या कर्मचाऱ्यांची कमतरता.

५) धोम बलकावडी कालव्यातुन त्याच्या मंजुर कोटयापेक्षा जास्त पाणी सोडणे. तथापि, असे देखील आढळुन आले की, त्याला जास्तीचा कोटा, धोम कालवा यंत्रणेची कायदेशीर मागणी

त्याच्या शिर्षस्थानी पुर्ण झाल्यावरच, हा अतिरिक्त कोटा दिला जातो. अशारितीने चांगल्या वर्षात जास्तीचे पाणी वाटुन घेण्याचा हा प्रकार असल्याने, त्याला अपीलार्थीवर विपरित परिणाम करणारे प्रमुख कारण म्हणता येणार नाही. म्हणुन हा विषय वर दिलेल्या निष्कर्षानुसार हाताळण्यात आला आहे.

**३) अपीलार्थींनी जसा दावा केला आहे, त्याप्रमाणे धोम सिंचन कालवा यंत्रणेला १०.५७ टीएमसी पाणी मिळण्याचा कायदेशीर हक्क आहे काय?**

अ) अपीलार्थींनी केलेल्या युक्तिवादाप्रमाणे धोम धरणात असलेल्या उपलब्ध पाण्याचे डी.पी.आर. प्रमाणे पाण्याचे नियोजन असे आहे.

| | |
|---|---|
| ३२९५५ हेक्ट. क्षेत्राचे सिंचन | १०.५७ टीएमसी |
| उ. सि. योजनेकरिता | ३.०० टीएमसी |
| घरगुती तथा औद्यागिक कारणांसाठी | ०.२४ टीएमसी |
| बाष्पीभवन | ०.९७ टीएमसी |
| एकुण | १४.७८ टीएमसी |

अपीलार्थींनी त्यांच्या म्हणण्याच्या पुष्ठयर्थ आरटीआय अंतर्गत माहिती प्राप्त केली.

ब) प्रतिवादी क्र. ४ उत्तरांत म्हणाले की, राज्य शासनाने १३/०९/२००४ मधे मंजुर केलेल्या प्रमाणे, ४ थ्या कृष्णा प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या अंतर्गत, धोम कालवा सिंचनासाठी ७. ५८ टीएमसी पाणी मंजुर केले आहे.

निष्कर्ष (३) अभिलेखाची तपासणी केल्यावर असे आढळुन आले आहे की.

१) कृष्णा प्रकल्पात त्याच्या आरंभापासुन बरेच बदल झाले आहेत.

२) अपीलार्थींनी जी कागदपत्रे सादर केलीत ते राज्य शासनाने २ जुलै १९९२ ला मंजुर केलेल्या नियोजनाप्रमाणे आहेत.

३) त्यानंतर १९९८ मधे धोम व कान्हेर पिकांचा आकृतिबंध १४१% पासून १२६% केला. तसेच बारमाही पिक १०% पासुन ६% इतके कमी केले आहे.

४) एकंदरीत पाण्याच्या वापराचे नियोजन, कृष्णा खोऱ्याकरिता, शासनाने २०/१०/२००१ च्या पत्राने केन्द्रीय जल आयोगाला कळविले आहे या नियोजनामधे, जिहे काथापूर धरुन पाण्याचा वापर कृष्णा प्रकल्पात ३२.०८५ टीएमसी आहे.

५) ४ थ्या सुधारित प्रशासकीय मान्यता जी १३ फेब्रुवारी २००४ मधे मंजुर झाली त्यामधील तरतूदीनुसार जी माहिती केन्द्रीय जल आयोगाला कळविली आहे, त्यांच्यांशी सुसंगत आहे. ४ थ्या सुधारित प्रशासकीय मान्यता कृष्णा प्रकल्पाच्या मधे धोम यंत्रणेसाठी (३२९२५ हेक्टर साठी) असलेली सिंचनाची तरतूद ७.५८ टीएमसी आहे.

प्राधिकरणाच्या मते, राज्य शासनाने दि. २०/१०/२००१ च्या पत्राने केंद्रिय जल आयोगाला कळविल्याप्रमाणे ५९९ टीएमसी पाणी वापराचा योजनेच्या अंतर्गत, जो कृष्णा पाणी तंटा न्यायाधिकाराने कोणत्याही पाणी–वर्षाकरिता ठरवला आहे, जिहे–काथापूर उ. सि. योजना व धोम बलकावडी धरण सुध्दा, तो राज्याला बंधनकारक आहे. या नियोजनामधे, जिहे काथापूर धरुन पाण्याचा वापर कृष्णा प्रकल्पात ३२.०८५ टीएमसी आहे. (२६.८६८ टीएमसी सिंचनासाठी + ४.८० टीएमसी पेयजल व ०.४१७ टीएमसी औद्योगिक वापराकरिता आहे) यामधे धोम कालव्या साठी सिंचनामधे पाण्याचा वापर ७.५८ टीएमसी आहे.

वर सांगितल्याप्रमाणे, प्राधिकरणाचे मताने, धोम कालव्यासाठी पाण्याचा वापर १०.५७ नसुन तो फक्त ७.५८ टीएमसी आहे. अशाप्रकारे या मुद्याचे उत्तर नकारार्थी येते.

**४) जोपर्यंत धोम धरण त्यांच्या ७५% क्षमतेपर्यंत भरत नाही तोपर्यंत धोम–बलकावडी कालव्यात पाणी सोडण्यास मनाई करणे योग्य आहे काय?**

अ) अपीलार्थींनी सांगितले आहे की, धोम धरण १९७७ मधे, ७५% अवलंबित्वासह बांधले आहे. नंतर २००६ मधे धोम बलकावडी धरण बांधले ज्याचे अवलंबित ५०% आहे. या आधारावर, अपीलार्थींनी प्रार्थना केली आहे की, धोम धरण ७५% भरत नाही तोपर्यंत धोम बलकावडी कालव्यातुन पाणी सोडु नये.

ब) प्रतिवादी क्र. ४ ने सादर केले की दोन्ही म्हणजे धोम व बलकावडीचे पाण्याचे नियोजन, हे ५०% अवलंबित्वावर, केलेले आहे. शा. नि. ०७/०३/२००१च्या प्रमाणे दोन्ही धरणात ३३% पाणी असल्यानंतर खरीप हंगामासाठी पाणी सोडले आहे.

**निष्कर्ष** (४) प्राधिकरणाला आढळुन आले आहे की दोन्ही कृष्णा प्रकल्प व धोम बलकावडी प्रकल्पाच्या ४ था (शेवटल्या) प्रशासकीय मान्यतेनुसार दोन्ही प्रकल्पांचे अवलंबित ५०% आहे. पुढे, प्राधिकरणाला आढळुन आले आहे की, धोम बलकावडी प्रकल्प अहवालात १.४२ टीएमसी पाणी वापराची खरीप हंगामात तरतुद आहे. त्यामुळे प्राधिकरणाचे असे मत आहे की, धोम आणि धोम बलकावडी दोन्ही मधे चल पाण्याचा साठा ३३ % झाला की, खरीप सिंचनासाठी या दोन्ही कालव्यातुन पाणी सोडता येते.

अशातऱ्हेने, या मुद्यावर उत्तर नकारार्थी आहे.

**५) धोम व धोमबलकावडी जलाशयांना जे पाणी मिळते त्याच्या वितरणासाठी काम करण्याकरिता मार्गदर्शन करणे आवश्यक आहे काय? जर तसे असेल तर काय मार्गदर्शन करता येईल?**

अ) अपीलार्थींनी प्रार्थना केली आहे की, त्यांच्या ड्राफ्ट अहवालात दिल्याप्रमाणे, धोम आणि धोम बलकावडी प्रकल्पांचे पाणी वापर ठरवावे; आणि धोम सिंचन यंत्रणेच्या कार्यावर कांही मुद्दे उपस्थित केले.

ब) प्राधिकरणाने या आधी म्हणजे २ जुन २०१७ ला, अपीलार्थींचा प्र. ४/२०१६ संबंधीचा आधीचा अर्ज कांही निर्देशासह पीडीआरओ ला परत पाठवला होता. त्यामधील क्र. २ व ३ चे संबंधित निर्देश असे आहेत.

२. पीडीआरओ ला निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनी अर्जात दिलेले सर्व संबंधित मुद्दे जे त्यांच्या समोर मांडले जातील, विचारात घेवुन स्वयंस्पष्ट असलेले आदेश द्यावेत. या आदेशामुळे क्षेत्रात काम करणाऱ्यांना मार्गदर्शिका म्हणुन वापरता येईल, अशी अपेक्षा आहे; तसेच त्यामुळे संबंधित व अर्थपुर्ण असलेली त्यांच्या पाणी हक्काची माहिती विविध हितकर्त्यांना मिळेल. सुनावणी झाल्यावर पीडीआरओ त्यांचे आदेश १ महिन्याच्या आंत निर्गमित करतील.

३) पीडीआरओ निर्धारित करतील की, याचिकाकर्ते पाणी वापर संस्थांना त्याचा पाण्याचा हक्काचा हिस्सा मिळतो की नाही, नसल्यास (त्याचे कारण शोधुन), आवश्यक निर्देश देतील ज्यामुळे याचिकाकर्त्यांच्या हिताचे संरक्षण होईल.

तथापि, पीडीआरओ ने हे मुद्दे त्यांच्या दि. २५/०५/२०१८ च्या आदेशातुन वगळले आहेत.

**निष्कर्ष (५) :—**

प्राधिकरणाला आढळुन आले की, जलग्रहण/पाणलोट क्षेत्र दोन्ही धोम आणि धोम बलकावडी जलाशयाचे जवळपास सारखे आहे. धोम धरणाच्या स्थळावर असलेले जास्तीचे पाण्याचा विचार करुन धोम बलकावडी प्रकल्पाचे नियोजन केले आहे. पुढे दोन्हीचे कालवे धोम जलाशयातुन सुरु होतात. धोम जल ग्रहण क्षेत्रातुन

धोम धरणापर्यंत मिळणाऱ्या पाण्याची प्रप्तिच्या ५० % अवलंबित्वावर पाण्याचे नियोजन, प्रकल्पाच्या विविध घटकांसाठी परिच्छेद क्र. १७ मधे सांगितल्याप्रमाणे केले आहे. त्यामुळे प्राधिकरणाचे असे मत आहे की, जरी हे प्रकल्पाचे घटक वेगवगळे मंजुर केले असले तरी, त्या सर्वांचे व्यवस्थापन एक संकुल (कॉम्प्लेक्स) म्हणुन करावे लागेल. कायमस्वरुपी व न्यायिक पाण्याच्या, विविध प्रवर्गाच्या वापरासाठी तसेच विविध प्रकल्प घटकांसाठी, वितरणासाठी, काम करण्यासाठी, मार्गदर्शक तत्वे ठरवणे गरजेचे आहे. अशारितीने पहिल्या भागातील मुद्यांचे उत्तर होकारार्थी येते.

**निष्कर्ष (५) , दुसऱ्या भागातील मुद्यावर :—**

पहिल्या भागाचे उत्तर होकारार्थी आल्यानंतर, प्राधिकरणाचे असे मत आहे की, खाली दिलेल्या संबंधित तथ्य व विचारात घेवून त्याप्रमाणे पाणी वाटून घेण्यासाठी मार्गदर्शक तत्वे देता येतील.

१) कृष्णा पाणी तंटा न्यायाधिकरण—१च्या निर्णयानुसार, महाराष्ट्र राज्याला कोणत्याही पाणी वर्षात कृष्णा खोरे क्षेत्रासाठी ५९९ टीएमसी पाणी मिळाले आहे. एकंदरीत पाणी वापराच्या महाराष्ट्र राज्याच्या नियोजनात, जो कोटा त्यांना वाटपात मिळाला आहे त्याचे अंतर्गत, राज्य शासनाने केंद्रिय जल आयोगाला कळविल्याप्रमाणे, कृष्णा प्रकल्पाचे वाटप, ज्यामधे धोम, कान्हेर व जिहे काथापूर उ. सिं. यो सामील आहे, ३२.०८५ टीएमसी आहे.

२) तसेच, धोम बलकावडीचे, जो कृष्णा प्रकल्पाचा भाग आहे, पाणी वाटप २.७५ टीएमसी (२.७० टीएमसी सिंचन व ०.०५ टीएमसी बाष्पीभवन) आहे.

३) वरील १) आणि २) मधे दिलेल्या तरतूदी अनिवार्य प्रकारच्या असुन त्यामुळे पुर्वीच्या ड्राफ्ट अहवालात दिलेल्या तरतुदी खारीज होतात.

४) कृष्णा प्रकल्प आणि धोम बलकावडी प्रकल्प या दोन्हीच्या ४ थ्या सुधारित प्रशासकीय मान्यतांशी, वर १) आणि २) मधे दिलेल्या तरतूदी सुसंगत आहे.

५) पिण्याच्या पाण्याचे वार्षिक पाणी वापर नियोजन धोम पाणलोट क्षेत्रात, ५० % अवलंबित्वासह, परिच्छेद १७ मधे, अभिलेख माहिती मधे, दिले आहे.

अशारितीने वर दिलेल्या तरतुदींचा विचार केल्यास, पाणी वाटुन घेण्यासाठी मार्गदर्शक तत्वे खालीलप्रमाणे असावीत.

१) सर्वसाधारण वर्षात प्रकल्प घटकागणिक ज्या तरतूदी परिच्छेद क्र. १७ मधे दिल्या आहेत त्यांचे पालन करावे. ज्याअर्थी, खरीप वापराचा कांही भाग, जलाशय क्षमतेच्या नियोजनात घेतला आहे, त्याअर्थी, पाण्याचा खरीप हंगामात वापर व तसेच वर्षाच्या उर्वरित भागात केलेला वापर हा जो हंगामाप्रमाणे प्रकल्पाच्या नियोजनात जशी अनुक्रमे तरतूद केली आहे, त्यानुसार त्याची पालना करणे गरजेचे आहे.

२) जो, सिध्दांत प्राधिकरणाने त्यांच्या २२/०९/२०१७ च्या आदेशात दिला आहे आणि जो प्राधिकरणाच्या वेबसाईटवर www.mwrra.org उपलब्ध आहे, जो निकषाच्या परिच्छेद–८ मधे दिला आहे, त्याचा वापर वापरकर्त्याच्या विविध प्रवर्गात चांगल्या किंवा वाईट वर्षात अनुक्रमे जास्त किवा कमी असलेल्या पाण्याच्या वाटपासाठी करावा. सिंचनासाठी उपलब्ध असलेले पाणी, विविध प्रकल्प घटकांमधे, त्यांच्या नियोजित पाणी वापरामधे दिल्याप्रमाणे, जे परिच्छेद १७ मधे दिलेल्या तक्त्याच्या रकाना क्र. ५ मधे कृष्णा पाणी तंटा लवादाने पाणी वापरावर ज्या मर्यादा दिल्या आहेत, त्याचे अधिन राहुन, वापरावे.

३) घटनेच्या २१ व्या कलमातील तरतूदी प्रमाणे आणि राज्य जल निती, २००३ च्या परिच्छेद २२.३ मधे दिलेल्या तरतूदी नुसार राज्य, त्याच्या सर्व नागरिकांना पेयजल प्राथम्याने उपलब्ध करुन देण्यास बांधील आहे, म्हणुन प्राधिकरणाचे मत आहे की, पेयजलासाठी पाण्याचा पुरवठा करतांना लाभ क्षेत्राच्या सिमेचे बंधन पाळण्याची गरज नाही. लाभक्षेत्राची सिमा ही संकल्पना

सिंचनापुरती लागु आहे. पाण्याचा वापर कार्यक्षम पध्दतीने करण्यासाठी पेयजलासाठी पाईप लाईन तथा टॅकर्सचा वापर व्हावा. पेयजलाच्या पुरवठयाकरिता नदी अथवा कालव्यातुन पाणी सोडतांना त्याची बरीच हानी होते, त्यामुळे हे टाळावे.

म्हणुन, प्राधिकरणाने विचारपुर्वक वरील मार्गदर्शक तत्वे, धोम संकुलाचे कायमस्वरुपी व्यवस्थापनासाठी व तसेच अपीलार्थींना त्यांचा कायदेशीर पाण्याचा कोटा मिळावा म्हणुन, निर्गमित केली आहे.

**६) रबी व उष्ण हवामानात धोम बलकावडी मधे पाणी सोडण्यास मनाई करणे न्यायोचित ठरते काय?**

अ) अपीलार्थींनी प्राधिकरणाला अशी विनंती केली आहे की, धोम बलकावडी प्रकल्प ४ माही करणे रबी व उष्णहवामान हंगामात धोम बलकावडी कालव्यात पाणी सोडण्यावर प्रतिबंध लावावा. यासाठी त्यांनी खालील कारणे सांगितली.

अ–१) १९९६ मधे मंजुर झालेल्या धोम बलकावडी च्या डीपीआर मधे फक्त ४ महिने खरीप हंगामात पाणी सोडण्याची तरतूद आहे.

अ–२) निरा–देवघर प्रकल्पाचे ०.९३ टीएमसी पाणी विचारांत घेवून धोम बलकावडी वर्ष २००० मधे ८ माही करण्यात आला. तथापि, निरा–देवघर प्रकल्पाचे डीपीआर मधे तशी ०.९३ टीएमसी पाण्याची तरतूद सिंचनासाठी धोमबलकावडी कालव्याला पाणी पुरवठा करण्याची, केलेले नाही. निरा देवघर प्रकल्पातुन धोम बलकावडी कालव्याला पाणी देण्यासाठी बांधकाम करण्याची कोणतीही योजना अजुन घेतलेली नाही.

अ–३) कृष्णा पाणी तंटा निवाडयात दिलेल्या तरतुदींची अंमल बजावणी करावी.

अ–४) कृष्णा प्रकल्पाच्या डीपीआर मधे पेयजलासाठी कोणतीही तरतुद केली नाही.

अ–५) धोम बलकावडी प्रकल्प ८ माही करावा यासाठी केंद्रिय जल आयोगाने परवानगी दिलेली नाही.

ब) प्रतिवादी क्र. ४ ने अपीलार्थींचे युक्तिवाद नाकारले व त्यांचे लिखित बयाण, दि. ३०/०७/२०१७ चे दाखल केले, ते खाली दिल्याप्रमाणे आहे.

ब–१) अपीलार्थी निम्नस्तरावरील पाणी वापर संस्था आहे. कालवा व प्रकल्प स्तरांवरील संस्था अजुन पंजीकृत झाल्या नाहीत. त्यामुळे त्यांना संपुर्ण धोम प्रकल्प किंवा धोम बलकावडी प्रकल्पाला आव्हान देता येत नाही. कारण ते त्यांच्या कार्यक्षेत्रात येत नाही.

ब–२) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने दि. ०४/०७/२००२ च्या आदेशाने ४ माही धोम बलकावडी प्रकल्पाची सुधारणा करुन ते जल नियोजन ८ माही केले. या पाणी नियोजनाला महाराष्ट्र शासनाने दुजोरा दिला आणि ४ थ्या सुधारित प्रशासकीय मान्यतेला, शा. नि. ३०/०५/२०१७ अन्वये मंजुरी दिली.

ब–३) ४ थ्या मान्यते सुधारित प्रशासकीय प्रमाणे धोम बलकावडी प्रकल्पाचा पाणी वापर ३.६३ टीएमसी आहे. हंगामाप्रमाणे, खरीपात १.४२ टीएमसी रबी मधे २.२१ टीएमसी असे हे वाटप आहे.३.६३ टीएमसी झाला आहे. ज्यामधे २.७० टीएमसी धोम बलकावडी व ०.९३ टीएमसी निरा देवघर ची साठवण समाविष्ट आहे. अशारितीने रबी हंगामासाठी १.२८ टीएमसी (२.७०–१.४२) तरतूद आहे.

ब–४) निरा देवघर कालवा ते धोम बलकावडी कालवा जोडणासाठी भांडवली खर्च राज्य शासन करणार आहे, म्हणुन धोम बलकावडीचे ४ महिन्याच्या आकृतिबंधाचे ८ माही करण्यासाठी केंद्रिय जल आयोगाच्या परवानगीची गरज नाही.

ब–५) राज्य शासनाला मिळालेल्या कोटयाच्या अंतर्गत हे पाणी वापर असल्यामुळे कृष्णा पाणी तंटा लवादाचे आदेशाचा भंग झाला नाही.

ब–६) सिंचनासाठी खरीप व रबी हंगामात पाणी दिले जाते. तथापि, वर्ष २०१२–१३ व २०१६–१७ मधे कालवा सल्लागार समितिच्या निर्देशाने व तसेच जिल्हाधिकारी, सातारा यांच्या निर्देशाने धोम बलकावडी धरणाचे पाणी पेयजलासाठी उष्ण हवामानात सोडण्यात आले.

**निष्कर्ष –६)**

वर परिच्छेद १७ मधे दिलेले वार्षिक पाण्याचा वापर नियोजन, जे धोम पाणलोट क्षेत्रावर ५० % विश्वासाहर्तेवर उपलब्ध आहे, त्याचा अभ्यास केल्यावर प्राधिकरणाचे असे मत आहे की, धोम संकुलाच्या पाण्यामधुन धोम बलकावडी कालव्याव्दारे रबी हंगामाच्या सिंचनासाठी उपलब्ध करुन दिले आहे; त्यामुळे या पाण्यावर प्रतिबंध लावता येत नाही. तथापि, उष्ण हवामानात धोम बलकावडी कालव्यातुन सिंचन करण्याचे प्रावधान नाही आहे. त्यामुळे उष्ण हवामानात धोम बलकावडी कालव्यातुन सिंचन करण्यासाठी पाणी सोडता येत नाही.

अशारितीने जो मुद्दा विचाराधीन आहे त्यावर प्राधिकरणाचे मत अंशत: होकारार्थी आहे.

**७) कमी पावसाच्या वर्षात धोम बलकावडी कालव्यात पाणी सोडण्यावर बंदी घालणे न्यायोचित ठरते काय?**

अ) पावसाची कमतरता असणाऱ्या काळात धोम बलकावडी कालव्यात पाणी सोडू नये अशी अपीलार्थींनी प्रार्थना केली आहे.

ब) प्रतिवादी क्र. ४ ने प्राधिरणाच्या लक्षात आणुन दिले की, कृष्णा प्रकल्पाचे पाणी नियोजन, ज्यामधे धोम बलकावडी २.७५ टीएमसीची तरतुद आहे ज्या व्दारे धोम बलकावडी कालव्याव्दारे पाणी वापरता येते.

**निष्कर्ष ७) :—**

प्राधिकरणाचे म्हणणे आहे की, धोम बलकावडी कालव्यातुन, पावसाचे दुर्भिक्ष्य असेलल्या वर्षात, पाणी घेण्यास मनाई करावी, ही अपीलार्थीची प्रार्थना, मान्य करता येत नाही. राज्य शासन जलनिती २००३ मधील, परिच्छेद क्र. २.८ च्या तरतूदी मुळे मान्य करता येत नाही.

अशारितीने या मुद्यावर उत्तर नकारार्थी येते.

**८) दरवर्षी २८ फेब्रुवारी नंतर, कालव्यातुन पाणी घेण्यावर बंदी घालणे न्यायोचित ठरते काय?**

अ) अपीलार्थीनी युक्तिवाद केला की, धोम डावा किनारा कलाव्यावरील उपसा यंत्रणाना ८ महिन्याच्या पिकाच्या आकृतिबंधाला मंजुरी मिळाली आहे. तथापि, उष्ण हवामानात देखील त्यातुन पाण्याचा उपसा केला जातो त्यामुळे अपीलार्थी विपरितपणे बाधित झाले आहेत.

ब) प्रतिवादी सुदधा धोम डावा किनारा कलाव्यावरील उपसा यंत्रणाना ८ महिन्याच्या पिकाच्या आकृतिबंधाला मंजुरी मिळाली आहे. तथापि, उष्ण हवामानात देखील त्यातुन पाण्याचा उपसा केला जातो या तथ्याशी सहमत आहेत. यावर नियंत्रण ठेवणे शक्य होत नाही. त्यांनी पुढे स्पष्ट केले की, शा. नि. दि. २१/११/२००२ अन्वये व्यक्तिगत उपस्याला मंजुरी मिळाली आहे.

**निष्कर्ष – ८) :**

प्राधिकरणाला आढळुन आले आहे की, शा. नि. दि. २१/११/२००२ अन्वये व्यक्तिगत उपस्याला मंजुरी मिळाली आहे; ज्यामधे निमज्जन, कालवा तसेच जल लक्ष्मी योजना समाविष्ट आहे, ज्यांची पाणी नियोजनात तरतूद नाही. त्यामुळे अपीलार्थी विपरितपणे बाधित झाले आहेत. या उपस्यांच्या पाणी वापरामुळे, धोम कालव्याचा कोटा आपुसकच कमी होतो, परिणामी अपालार्थी जे धोम डावा किनारा, कालवाच्या पुच्छ टोकाला आहेत, त्यांना त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी या व्यक्तिगत पाणी उपस्यावर कडक नियंत्रण ठेवावे.

प्राधिकरणाच्या मते निमज्जन तथा धोम कालव्यावरील या व्यक्तिगत उपस्यांमुळे अपिलार्थींना कमी पाणी पुरवठा होतो. त्यामुळे या मुद्याचे उत्तर होकारार्थी येते आणि त्यांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी प्राधिकरणाला खालील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक वाटते.

अ) उपस्याव्दारे व्यक्तिगत उपसा सिंचन योजनेमधे पाणी उचलण्यास २८ फेब्रुवारी नंतर बंदी घालावी.

ब) व्यक्तिगत उपसा सिंचन योजनेत पाणी घेणाऱ्यांनी ज्या अटी शा. नि. दि. २१/११/२००२ मधे दिल्या आहेत त्यांचे पालन करावे, जसे पाण्याचे मीटर लावणे, ठिबक सिंचन पदध्तीचा वापर करणे, अन्यथा त्यांची परवानगी ताबडतोब रद्द करावी.

क) या व्यक्तिगत उपसा चालकांनी त्यांच्या हंगामातील मंजुर कोटयापेक्षा जास्त पाणी उचलण्याची त्यांना परवानगी देवू नये. त्यामुळे या मुद्यावरील उत्तर होकारार्थी आहे.

**९) पीडीआरओ च्या प्रकरण क्र. २/२०१७ च्या दि. २५ मे २०१८ च्या आदेशाला, अपीलार्थींनी जे आव्हान केले आहे, त्यात ढवळा ढवळ करणे आवश्यक आहे काय?**

अ) अपीलार्थींनी प्राधिकरणाला सांगितले की पीडीआरओ यांनी दिलेल्या २५/०५/२०१८ च आदेशात स्पष्टता नाही; आणि त्यांनी तो आदेश रद्द करण्याची प्रार्थना केली.

ब) प्रतिवादी क्र. ६ नी सुध्दा विनंती केली की हा आदेश रद्द करावा.

**निष्कर्ष—९)**

या प्राधिकरणाला आढळुन आले की पीडीआरओ ने हा आदेश करतांना प्राधिकारणांचे दि. १२/०६/२०१७ च्या आदेशाकडे दुर्लक्ष केले.

या आधी, अपीलार्थींचा अर्ज (प्र. क्र. ४/२०१६) परत करतांना स्पष्टपणे पीडीआरओ ला निर्देशित केले की,

> पीडीआरओ ला निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनी अर्जात दिलेले सर्व संबंधित मुद्दे जे त्यांच्या समोर मांडले जातील, विचारात घेवुन स्वयंस्पष्ट असलेले आदेश द्यावेत. या आदेशामुळे क्षेत्रात काम करणाऱ्यांना मार्गदर्शिका म्हणुन वापरता येईल, अशी अपेक्षा आहे; तसेच त्यामुळे संबंधित व अर्थपुर्ण असलेली त्यांच्या पाणी हक्काची माहिती विविध हितकर्त्यांना मिळेल. सुनावणी झाल्यावर पीडीआरओ त्यांचे आदेश १ महिन्याच्या आंत निर्गमित करतील.
>
> पीडीआरओ निर्धारित करतील की, याचिकाकर्ते पाणी वापर संस्थांना त्याचा पाण्याचा हक्काचा हिस्सा मिळतो की नाही, नसल्यास (त्याचे कारण शोधुन), आवश्यक निर्देश देतील ज्यामुळे याचिकाकर्त्यांच्या हिताचे संरक्षण होईल.
>
> या प्राधिकरणाच्या वर दिलेल्या निर्देशांकडे PDRO नी दुर्लक्ष केले. PDRO ने निर्गमित केलेल्या आदेशात स्पष्टता नाही. अपीलार्थींना मिळणाऱ्या अपुऱ्या पाणी पुरवठ्याच्या कारणांच्या तपशीलावर त्यांनी उहापोह केलेला नाही. या बाबत त्यांनी

कार्यान्वित करण्यायोग्य पुरेशी मार्गदर्शक तत्वे दिली नाहीत. त्यामुळे या प्राधिकरणाचे विचारांती असे मत झाले आहे की PDRO ने जारी केलेला दि. २५/०५/२०१८ आदेश रद्दबातल करावा कारण त्यामुळे निष्कर्षामध्ये दिलेल्या निर्देशांमध्ये व कार्यान्वित करण्यायोग्य आदेशाच्या भागामधे अडथळा निर्माण होतो. अशाप्रकारे या मुद्याचे उत्तर होकारार्थी येते.

**१०) अपीलार्थींना न्याय मिळावा या हेतुने एखादे विशेष मार्गदर्शन करता येई अथवा अनुतोष देण्याची गरज आहे काय?**

अ) हे खरे आहे की, अपीलार्थींना त्यांचा पाण्याचा हिस्सा कधीच पुर्णपणे मिळाला नाही, जरी एखाद्या वर्षात पुरेसा पाऊस पडला आणि जलशयात पुरेसे पाणी असले तरी, ज्यांची कारणे निष्कर्ष (२) मधे दिली आहेत.

ब) धोम हा बहुद्देशीय प्रकल्प आहे. या प्रकल्पाने निरनिराध्या पाणी वापर क्षेत्रांना, म्हणजे पेजलय, उद्योग, शेती इ. शेती क्षेत्राचे पाणी वाटप सगळया प्रकल्प घटकांना जसे, धोम डावा किनारा कालवा, धोम उजवा किनारा कालवा, धोम बलकावडी कालवे, शासकिय उपसा सिंचन योजना, निमज्जन आणि कालव्यावर असलेल्य व्यक्तिगत उपसे, जिहे काथापूर उ.सि.यो. गटांना पाणी पुरवठा होतो. त्यामुळे त्यांच्यामध्ये असलेले पाण्याचे हक्काबद्दल स्पष्ट सांमजस्य असणे आवश्यक आहे.

क) धोम व धोमबलकावडी प्रकल्प अहवाल तिनदा सुधारित करण्यात आले. त्यामुळे लाभार्थीमध्ये पाण्याच्या हक्काबाबत संभ्रम आहे.

ड) धोम यंत्रणा फारच दबावाखाली काम करते, त्यामुळे त्याचे व्यवस्थापन कांही विशिष्ट मार्गदर्शक तत्वांचे आधारे जे न्यायिक व स्पष्ट असले पाहिजे, करावे लागते. त्यामुळे, या प्राधिकरणाचे मत आहे की, धोम यंत्रणेमधे (धोम बलकावडी सहित) उपलब्ध असलेल्या पाण्याचे वितरण करण्यासाठी, मार्गदर्शक तत्वे देणे गरजेचे आहे.

अशाप्रकारे वरील मुद्यांचे उत्तर होकारार्थी असुन व त्याचे निष्कर्ष सध्याच्या आदेशाच्या कार्यान्वित करण्याच्या भागात नोंदविले आहे.

**निर्देश**

३०) वादामधील सर्व पक्षकाराचे म्हणणे ऐकुन घेतल्यावर व अभिलेखात असलेल्या कागदपत्रांचा व माहितीचा तसेच पक्षकारांनी दिलेली माहिती लक्षात घेवून, त्यावर अभिनिर्णय घेवून तथा मुद्दे सांचेबध्द करुन, हे प्राधिकरण पीडीआरओ ने दिलेले आदेश खारीज करते व पुढे निर्देशित करते की,

अ) प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना, खालील प्रमाणे,

१) अधिनियमाच्या कलम १२ (७) मधे दिल्याप्रमाणे पुच्छ ते शिर्ष याप्रमाणे सिंचन करण्याची अनुपालना काटेकोरपण करावी आणि अपीलार्थी पाणी वापर संस्थांना कायदेशीर पाण्याचे हक्क मिळतील याची खातरजमा करावी.

२) अपीलार्थी पाणी वापर संस्थांबरोबर केलेल्या करारनामा जर आधी सही केल्यावर मुदत बाहय झालेला असेल किवां आधी सही केलेला किवा नुतनीकरण केलेला नसेल, तर करार नाम्यावर सही करुन तो कार्यान्वित करावा.

३) व्यक्तिगत उ. सि. योजना असणाऱ्याचे नाव ज्यांना शा. नि. दि. २१/११/२००२ च्या तरतुदीनुसार, निमज्जन व कालव्यातुन पाण्याच्या उपस्याची परवानगी मिळाली आहे, त्यांच्या पुर्ण तपशीलासह, या प्राधिकरणाने दि. २०/०२/२०१९ ला प्रचलित केलेल्या विहित प्रपत्रामधे देवून, यादी प्रकाशीत करावी. धोम जलाशयातुन किंवा त्याच्या कालव्यातुन कोणीही अनाधिकृतपणे किंवा कोटयापेक्षा जास्त पाण्याचा उपसा करणार नाही, याची खातरजमा करावी.

४) ज्याअर्थी, शासकीय सिंचन योजना किंवा डीएलबीसी वर, त्याचप्रमाणे व्यक्तिगत उ. सि. योजनांचा ८ महिन्यांचे पाण्याचे हक्क असल्यामुळे, धोम जलाशयातुन अथवा कालव्यातुन २८ फेब्रुवारी नंतर पाण्याचा उपसा होणार नाही.

५) शा. नि. दि. २१/११/२००२ मधे दिलेल्या अटी जसे पाण्याचे मीटर बसवणे, ठिबक सिंचन पध्दतीचा वापर, ज्यानुसार व्यक्तिगत उ. सि. योजनला मंजुरी मिळाली आहे, त्याच्यावर देखरेख ठेवावी व अटींच्या अनुपालनेची खातरजमा करावी.

६) हंगामातील मंजुर कोटयाच्या आत व्यक्तिगत उ. सिं. यो. ने मालक पाणी उचलतात यावर देखरेख ठेवणे.

७) साधारण वर्षात धोम–बलकावडी कालव्यात सोडणारे पाणी २.७० टीएमसी पर्यंत १.४२ टीएमसी खरीप मधे व १.२८ टीएमसी रबी मधे मर्यादित राहील याची खातरजमा करुन घ्यावी. धोम बलकावडी प्रकल्प ८ माही असल्यामुळे, त्यातुन सिंचनासाठी २८ फेब्रुवारी नंतर पाण्याचा उपसा होणार नाही.

८) धोम आणि धोम बलकावडी जलाशयात उपलब्ध असलेले पाणी, एकात्मिक पध्दतीने, त्यांना एक संकुल समजुन, पाण्याचे वितरण होईल याची खात्री करुन घ्यावी. साधारण

वर्षात सिंचनासाठी उपलब्ध असलेले पाणी, विविध प्रकल्प घटकांमधे, त्यांच्या नियोजित पाणी वापरामधे दिल्याप्रमाणे, जे परिच्छेद १७ मधे दिल्याप्रमाणे, त्याच्या कोटयानुसार पाणी वापर करावा.

जो, सिध्दांत प्राधिकरणाने त्यांच्या २२/०९/२०१७ च्या आदेशात दिला आहे आणि जो प्राधिकरणाच्या वेबसाईटवर www.mwrra.org उपलब्ध आहे, जो निकषाच्या परिच्छेद–८ मधे दिला आहे, त्याचा वापर वापरकर्त्यांच्या विविध प्रवर्गात चांगल्या किंवा वाईट वर्षात अनुक्रमे जास्त किवा कमी असलेल्या पाण्याच्या वाटपासाठी करावा. अशा रितीने सिंचनासाठी उपलब्ध असलेले पाणी, विविध प्रकल्प घटकांमधे, त्यांच्या नियोजित पाणी वापरामधे दिल्याप्रमाणे, जे परिच्छेद १७ मधे दिलेल्या तक्त्याच्या रकाना क्र. ५ मधे कृष्णा पाणी तंटा लवादाने पाणी वापरावर ज्या मर्यादा दिल्या आहेत, त्याचे अधिन राहुन, वापरावे.

ब) राज्य शासन व कार्यकारी संचालक यांचेसाठी :

१) ठरलेल्या डीजाईनप्रमाणे पाणी प्रवाह वाहण्याची धोम कालव्याची क्षमता पुर्नस्थापित करण्यासाठी, तसेच कालव्याच्या बांधकामांच्या डागडुजीसाठी जी तरतूद, मजनिप्रा अधिनियम २००५ च्या कलम ११ (क्यु), वाचा परिच्छेद ९, राज्य जल नीती २००३ केली आहे, त्यासाठी पुरेसा निधि उपलब्ध करुन द्यावा.

२) पाणी प्रवाहित होत असतांना होणाऱ्या हानीत कपात व्हावी म्हणुन एका कालमर्यादा असलेल्या कामाचे नियोजन करुन त्याची अंमलबजावणी करावी, ज्यायोगे पाणी प्रवाहित करण्याची धोम कालव्याची क्षमता पुनर्स्थापित होईल व कालव्याची तथा त्यावरील बांधकामाची डागडुजी होईल.

३) या प्रकल्पावर व्यवस्थापन कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या ज्या जागा रिकाम्या आहेत त्या भराव्यात ज्यामुळे कार्यक्षम व समन्यायी पाणी वितरणाचा या प्रकल्पाच्या कामावर परिणामकारक नियंत्रण ठेवता येईल.

अपील अशा रितीने निकालात काढले आहे, ज्यात खर्चाचा उल्लेख नाही, निर्देशांच्या अनुपालनाच्या जे वर दिलेले आहे, आधिन राहुन.

०९/०४/२०१९ ला दिले.

वर दिलेल्या निर्देशांच्या अंमलबजावणीची अनुपालनाचे पुनर्विलोकन करण्यासाठी विषय ११/०६/२०१९ च्या यादीमधे घ्यावा.

| | | |
|---|---|---|
| स्वा. | स्वा. | स्वा. |
| एस. टी. सांगळे | विनोद जे. तिवारी | व्ही. एम. कुळकर्णी |
| सदस्य (ई.) | सदस्य, (विधि) | सदस्य (ज. सं. अभियांत्रीकी) |

स्वा.
के. पी. बक्षी
अध्यक्ष